दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २१५ I मंगळवार १९ मे २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## कुंडलिनी आणि आरोग्य...



'सहजयोग'
भाग ५५

एकदा तुम्ही सहजयोगामध्ये जर साक्षात्कारी पदाला प्राप्त झालात, तर तुम्हाला औषध, डॉक्टर वगैरे काहीही नको आणि सगळे रोग मानसिक, किंवा शारीरिक रोग नेहमीसाठी निघून जातात. सहजयोगासाठी तुम्हाला काही पैसे द्यायला नकोत. तुम्हाला त्याच्यासाठी काही विशेष मेहनत करायची नाही. जसं एखादं बी स्वत: उपजतं तसं तुमच्यात बसलेलं बीज अंकुरतं. तुमच्यामध्ये तो अंकुर आहे आणि त्या अंकुराला विद्वानांनी कुंडलिनी हे नाव दिलेले आहे. जसं प्रत्येक बी मध्ये अंकुर असतो तसं तुमच्या प्रत्येकामध्ये ते अंकुर आहे. बी आपोआपच उगवतं, तसं तुमच्यात असलेला परमेश्वरानी ठेवलेला जो अंकुर आहे तो आपोआपच वर येतो. पण एवढंच आहे, जसा एखादा दीप तुम्ही सजवून ठेवलेला असला तरी तो आपोआप पेटत नाही त्याला एक पेटलेला दीप जवळ आणायला पाहिजे, त्याप्रमाणे सहजयोगातसुद्धा जो दीप पेटलेला आहे तोच न पेटलेल्या दिव्यांना पेटवू शकतो. कुंडलिनी ही तुमची आई आहे. ती जन्मोजन्मी तुमच्या बरोबर जन्मते. ती तुमच्यामध्ये वास करते आणि आई किती पवित्र वस्तू आहे हे आपल्याला माहीत आहे पण ही नुसती पवित्रता तुमची आई आहे आणि ती त्या क्षणाची वाट बघत असते ज्या वेळेला अशी कोणी तरी व्यक्ती जी त्या प्रेमाने ओतप्रोत असेल, ती समोर आली की कुंडलिनी आपोआप उभी होते आणि तुम्हाला त्याचा साक्षात्कार घडतो.

२५ मार्च १९७७ कळवा अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191
सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूका जाहीर

## १८ जून रोजी होणार मतदान; २२ जूनला निकाल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** पावसाळी अधिवेशनाआधी विधान परिषदेच्या सदस्यसंख्येत आणखी भर पडणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. १८ जून रोजी मतदान तर २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे. एकूण १७ जागांवर निवडणूक होणार, ज्यातील एका ठिकाणी पोटनिवडणूक होणार आहे. चंद्रशेखर बावनकुळे आमदार राहिलेल्या विधान परिषदेच्या नागपूर मतदारसंघासाठी देखील पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच राज्यात न झाल्याने या मतदारसंघामध्ये पूर्वी निवडून आलेल्या आमदारांचा कार्यकाळ संपुष्टात येऊनही निवडणूक होऊ शकली नाही. अशात, गेल्या दोन अडीच वर्षांपासून आमदारकीच्या जागा रिक्त आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील एकूण मतदार संख्येच्या ७५ टक्के मतदार संख्या असेल तर विधान परिषदेची निवडणूक घेता येते. विधान परिषदेच्या एकूण ७८ सदस्य संख्येपैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे निवडून जात असतात

निवडणूक कार्यक्रम–
निवडणुकीची अधिसूचना– २५ मे
अर्ज भरण्याची शेवटची तारीख– १ जून
उमेदवारी अर्जांची छाननी– २ जून
अर्ज माघारीची मुदत– ४ जून
मतदान– १८ जून (स.८ ते दु.४)
मतमोजणी– २२ जून

### निवडणूक जाहीर झालेले १७ मतदारसंघ सोलापूर

अहिल्यानगर
ठाणे
जळगाव
सांगली–सातारा
नांदेड
यवतमाळ
पुणे
भंडारा–गोंदिया
रायगड–रत्नागिरी–सिंधुदुर्ग
नाशिक
वर्धा–चंद्रपूर–गडचिरोली
अमरावती
धाराशिव–लातूर–बीड
परभणी–हिंगोली
छत्रपती संभाजी नगर–जालना
नागपूर




# तारळी–निवकणेनंतर आता कोयना धरणावरही अदानीचा डोळा

- पाटण तालुका बनणार 'एनर्जी हब'?
- हायड्रो पंप स्टोरेज प्रकल्पासाठी कोयना परिसराची पाहणी सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुरंदर :** वीजनिर्मितीसाठी तारळी आणि निवकणे धरणांनंतर आता कोयना धरणावरही अदानी ग्रीन एनर्जीच्या हायड्रो पंप स्टोरेज प्रकल्पाचा डोळा लागल्याची माहिती समोर येत आहे. तारळी धरणावर प्रकल्पाचे काम वेगाने सुरू असतानाच निवकणे परिसरात भूसंपादनाच्या हालचालींना वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर कोयना धरण परिसरातही अदानी कंपनीकडून सर्वेक्षण सुरू असल्याचे समोर आले असून, भविष्यात येथेही मोठा हायड्रो पंप स्टोरेज प्रकल्प उभारला जाणार असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

कोयना धरणग्रस्तांचे प्रश्न अद्याप शासनदरबारी प्रलंबित असताना कोयना प्रकल्प खासगी कंपनीच्या ताब्यात देण्याच्या हालचाली पडद्यामागे सुरू असल्याचा आरोप स्थानिक स्तरावरून केला जात आहे. गोपनीय सूत्रांच्या माहितीनुसार शासनस्तरावर यासंदर्भात प्राथमिक हालचाली सुरू आहेत.

**वीज निर्मितीचे नवे 'एनर्जी हब' ठरणार पाटण**
सध्या कोयना वीज प्रकल्पातून २२०० मेगावॉट, तर पवनचक्की प्रकल्पांतून ७३० मेगावॉट अशी एकूण २९३० मेगावॉट वीजनिर्मिती होत आहे.
**याशिवाय अदानी ग्रीन एनर्जीचे प्रस्तावित प्रकल्प**
तारळी धरण – १५०० मेगावॉट
निवकणे धरण – २७०० मेगावॉट
प्रस्तावित कोयना धरण – १०,००० मेगावॉट
अशी एकूण १४,२०० मेगावॉट अतिरिक्त वीजनिर्मिती प्रस्तावित असल्याने पाटण तालुका भविष्यात देशाच्या ऊर्जा नकाशावर महत्त्वाचे केंद्र ठरण्याची शक्यता आहे.

पाटण तालुका हा महाराष्ट्रातील वीजनिर्मितीचे माहेरघर म्हणून ओळखला जातो. देशभरातील वाढती वीज मागणी लक्षात घेता पाटण तालुक्याची भौगोलिक रचना हायड्रो पंप स्टोरेज प्रकल्पांसाठी अनुकूल असल्याचे संकेत ऊर्जा क्षेत्रातील कंपन्या आणि शासनाच्या अभ्यासातून समोर आले आहेत. याच पार्श्वभूमीवर तारळी धरणावर अदानी ग्रीन एनर्जीचा १५०० मेगावॉट क्षमतेचा प्रकल्प वेगाने उभारला जात आहे. सुमारे ५,६७५ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पासाठी २०२४ पासून डोंगर (पान ४ वर)



# वऱ्हाडाच्या ट्रकला पालघरमध्ये भीषण अपघात

## १२ जणांचा मृत्यू तर २५ जण गंभीर जखमी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पालघर :** पालघर जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर वऱ्हाडाच्या ट्रकचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. वऱ्हाडाची ट्रक आणि कंटेनरमध्ये हा भीषण अपघात झाला. यामध्ये १२ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. तर २० ते २५ जण जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, मृत्यूच आकडा वाढण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर वऱ्हाडाच्या ट्रकचा भीषण अपघात झाला आहे. पालघरच्या धानीवरी येथे वऱ्हाडाची ट्रक आणि कंटेनर मध्ये हा भीषण अपघात झाला. वऱ्हाडाच्या ट्रक मध्ये १०० पेक्षा जास्त वऱ्हाडी असल्याची माहिती मिळत आहे. आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. वीस ते पंचवीस जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर कासा उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान, एकाच वेळी तब्बल १२ जणांचा मृत्यू झाल्यानं हळहळ व्यक्त केली जात आहे.

जखमींना स्थानिकांच्या आणि प्रशासनाच्या मदतीने कासा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेनंतर खासदार हेमंत सावर यांनीही घटनास्थळी धाव घेतली. धानीवरी येथे घडलेल्या तीन वाहनांच्या अपघातामध्ये आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला असून वीस ते पंचवीस गंभीर जखमी असल्याची माहिती पालघरच्या पोलिस अधीक्षक यतीस देशमुख यांनी दिली आहे. खासदार हेमंत सावरा यांनीही घटनास्थळाला भेट दिली असून याबाबतीत अपघातात जखमींना सर्वोतोपरी मदत केली जाईल, असे म्हटले. दरम्यान, या दुर्दैवी घटनेनंतर अपघातस्थळी वऱ्हाडी मंडळींचा आक्रोश मन हेलावून टाकणारा होता, अनेकांनी या अपघातात आपले आप्तेष्ट आणि जवळचे नातेवाईक गमावले आहेत.

## महत्त्वाचे..



### डिझेल दरवाढीमुळे एसटी प्रवास महागणार?

मुंबई : एसटीला १० लाख ८७ हजार लिटर डिझेल लागतं. इंडियन ऑईलकडून डिझेल पुरवठा होतं आहे. मागील आठवड्यात ३ रुपये दर वाढवला आहे. दरवाढीमुळे ३३ लाख ७० हजार आम्हाला जास्त मोजावे लागत आहेत. यामुळे महामंडळाचा वर्षाला १२४ कोटींचा तोटा होतो आहे. जागतिक पातळीवर युद्धाचा भडका उडाल्यास आणखी परिणाम होईल. पंतप्रधान यांनीही आवाहन केलं आहे. ऋभविष्यात काय होईल हे आता सांगता येत नाही. विशेष सवलत देण्याचा निर्णय झाल्यास आम्ही दरवाढ करणार नाही. उद्या कॅबिनेट बैठक आहे, मुख्यमंत्री असतील तेव्हा त्यांना पत्र देणार आहेत. मे पर्यंत आम्ही थांबणार आहोत. पुढील १० ते १२ दिवस केंद्र आणि राज्य सरकारनं पुर्तता केली तर दरवाढ करणार नाही, मात्र पुर्तता न झाल्यास दरवाढ करावी लागेल, ऑईल कंपनीने पूर्व किंमतीत दिलं तर दरवाढ करणार नाही. इंधनवाढ झाली तर आम्हाला दरवाढ करावी लागेल. ज्या घटकांना सवलती दिल्या आहेत त्या लागू राहतील, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

# २६ तारखेला यांनी बैल कापला तर...

## आ. संग्राम जगताप यांचा पोलिसांना इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बीड :** 'शुरूवात वो लोग करते है लेकीन खत्म हम करते है...' जनगणना झाली तर यांची संख्या ४० कोटींच्या पुढे जाईल. ६ वर्षांच्या मुलीपर्यंत येण्याची त्यांची हिंमत झाली. ही विचारधारा हिंदूत्ववादी लोकांनी विसरता कामा नये. तक्रार देण्यासाठी गेल्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये आले, त्यांनी दगडफेक केली, हे लोक भयभीत करतात. परंतु या झुरळांना आता घाबरण्याची गरज नाही, २६ तारखेला यांनी बैल कापला तर २७ तारखेला आम्ही येऊ, असा इशारा आ. संग्राम जगताप यांनी पोलीस प्रशासनाला दिला.



बीड जिल्ह्यातल्या नेकनूरमध्ये हिंदू जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चाला (पान ४ वर)

**दंगल झाली तर पोलीस जबाबदार : महेश लांडगे**
**सहा वर्षांच्या मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न होतो, पण मदत होत नाही. सर्वधर्म समभावचा बुडबुडा बाहेर काढा. जो कायदे मानणार नाही, त्यासाठी दांडे हातात घ्या. आपल्यामध्ये काही पुरोगामी विचारांचे किडे आहेत. पुरोगामी विचाराच्या राजकीय लोकांना लाज वाटली पाहिजे. आमच्याकडे पण मतदार आहेत, पण आम्ही स्वार्थी नाहीत. छत्रपती संभाजीनगरला परवा एकाचं घर पाडलं. पोलिसांनी जरा गांभीर्याने घ्यावं, पोलिसांनी जर अशा पद्धतीने पक्षपात केला, न्याय दिला नाही तर मग दंगल झाली तर तुम्ही जबाबदार असाल, असा इशारा यावेळी लांडगे यांनी दिला आहे.**

# शिर्डीत देशातील सर्वात मोठ्या संरक्षण कारखान्याचे संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- जिल्ह्यात संरक्षण उत्पादन क्षेत्राला मोठी चालना
- १५५ मिली मीटरचे प्रतिवर्षी पाच लाख तोफगोळे तयार होणार

शिर्डी : अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच मोठ्या प्रमाणावर संरक्षण साहित्य उत्पादन उद्योग उभा राहत असून, शिर्डी येथील सावळीविहीर औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन येत्या २३ मे रोजी संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्या हस्ते होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार असून, या प्रकल्पामुळे जिल्हा देशातील महत्त्वाचे संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून विकसित होणार असल्याची माहिती जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व ग्लोब फोर्ज लिमिटेडचे संचालक तथा चेअरमन रविकांत यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.



**हे ऐतिहासिक उद्घाटन : गणेश निबे**
आपले युवा मन हे आत्मनिर्भर भारताचे खरे शिल्पकार आहेत. ग्लोब फोर्ज लिमिटेडमध्ये आम्हाला ठाम विश्वास आहे की आपल्या देशाची खरी ताकद विद्यार्थ्यांच्या कल्पकता, ऊर्जा आणि जिद्दीमध्ये आहे. हे उद्घाटन केवळ नवीन उत्पादन केंद्र सुरू करण्यापुरते मर्यादित नाही; तर भारताच्या संरक्षण आणि तांत्रिक क्षमतांचे भविष्य पाहण्यासाठी पुढील पिढीतील नवोन्मेषकांना दिलेले आमंत्रण आहे. मी देशभरातील विद्यार्थी आणि युवा व्यावसायिकांना या ऐतिहासिक प्रसंगाचा भाग होण्यासाठी मनःपूर्वक आमंत्रित करतो. त्यांना अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची, उद्योग नेते, चडचए प्रतिनिधी आणि तंत्रज्ञान तज्ज्ञांशी संवाद साधण्याची तसेच नवकल्पना, सहकार्य आणि करिअर विकासासाठी नवीन संधी शोधण्याची ही अनोखी संधी असेल.

या प्रकल्पामध्ये १५५ मिलीमीटर क्षमतेच्या तोफगोळ्यांचे उत्पादन करण्यात येणार असून, प्रतिवर्षी पाच लाख तोफगोळे तयार करण्याची क्षमता या कारखान्याची असेल. खाजगी क्षेत्रातील तोफगोळा उत्पादनाची ही देशातील सर्वात मोठी क्षमता मानली जात असून, संपूर्ण उत्पादन तंत्रज्ञान व कच्चा माल स्वदेशी आहे. हा प्रकल्प अवघ्या एका वर्षात उभारण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत', 'मेक इन इंडिया' व (पान ४ वर)

# सौर ऊर्जा प्रकल्पामुळे दिवसा बारा तास वीज मिळणार : ना. विखे

## दमणगंगा–वैतरणा गोदावरी प्रकल्पा मुळे तळेगाव परिसराचा विकास वेगाने होणार

- तळेगाव दिघे येथे ५ मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाचे लोकार्पण;
- पारेगाव खुर्द येथे नव्या प्रकल्पाचे भूमिपूजन,
- ९०० शेतकऱ्यांना दिवसा त्रि–फेज वीजपुरवठा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** शेतकऱ्यांना दिवसा बारा तास वीज देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून या निर्णयाची अंमल बजावणी सौर ऊर्जा प्रकल्पांच्या माध्यमातून सुरू झाली आहे. या सोबतच दमणगंगा–वैतरणा–गोदावरी प्रकल्पाचे पाणी थेट तळेगाव परिसरापर्यंत आणून या भागातील पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यावर शासनाचा भर आहे. त्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासह स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होईल, असा विश्वास राज्याचे जल संपदा मंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.



संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे येथे महावितरणच्या पाच मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा तसेच पारेगाव खुर्द येथील पाच मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे भूमिपूजन मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते पार पडले.



यावेळी आ. अमोल खताळ, भाजपचे ज्येष्ठ नेते भीमराज चत्तर, भाजप वैद्यकीय आघाडीचे जिल्हाप्रमुख डॉ. अशोक इथापे शिवसेनेचे जिल्हा संघटक विठ्ठल घोरपडे, तालुकाप्रमुख राजेंद्र सोनवणे, भाजपचे निमोन मंडलाध्यक्ष श्रीकांत गोमासे, भाजप अभियांत्रिकी सेलचे प्रमुख हरीश चकोर, बाप कंपनीचे प्रमुख रावसाहेब घुगे तसेच तळेगावचे माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब दिघे, सरपंच उषा दिघे, माजी उपसभापती नामदेव दिघे, शिवसेना वैद्यकीय सेनेचे जिल्हाप्रमुख संतोष डांगे, उपसरपंच मयूर दिघे, महावितरणचे कार्यकारी अभियंता प्रदीप वट्टमवार, सहाय्यक अभियंता देशपांडे, उपकार्यकारी अभियंता पाटील यांच्यासह स्थानिक महायुतीचे पदाधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, सरपंच आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील (पान ४ वर)

**निळवंडे धरणाच्या माध्यमातून गायत्री खदानीत पाणी सोडून तळेगाव परिसरातील पाणीटंचाई दूर करण्यात आली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकारामुळे दमणगंगा–वैतरणा प्रकल्पात संगमनेर तालुक्यातील गावांचा समावेश झाला आहे. तसेच बिरोबा देवस्थानच्या विकासासाठी पाच कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असल्याचे आमदार खताळ यांनी नमूद केले.**

# देवस्थानांच्या जमिनी : सुधारणा की हस्तक्षेप?

राज्याच्या महसूल प्रशासनावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन प्रकरणातील कथित ३१० कोटी रुपयांच्या घोटाळ्यामुळे महसूल यंत्रणेतील भ्रष्टाचाराचा विदारक चेहरा समोर आला आहे. या प्रकरणात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना अटक होऊन न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली, ही बाब केवळ एका अधिकाऱ्याची वैयक्तिक चूक म्हणून पाहता येणार नाही. उलट प्रशासनाच्या सर्वोच्च स्तरावर बसलेली भ्रष्ट मानसिकता किती खोलवर




रुजली आहे, याचे हे धक्कादायक उदाहरण आहे.

एकीकडे बीडमधील भूसंपादन घोटाळा, तर दुसरीकडे नाशिकमधील उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे पाटील यांच्यावर भोंदू बाबा खरात यांच्या पत्नीच्या नावे अवैध संपत्ती जमा केल्याचे आरोप या दोन्ही घटना वेगवेगळ्या असल्या तरी त्यामागची प्रवृत्ती एकच आहे ‑ अधिकाराचा गैरवापर आणि सत्तेच्या बळावर संपत्ती उभारण्याची लालसा. समाजाला न्याय देण्याची, शासनाच्या योजनांची अंमलबजावणी करण्याची आणि कायद्याचे राज्य टिकवून ठेवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, तेच अधिकारी जर भ्रष्टाचाराच्या दलदलीत अडकले, तर सामान्य माणसाने न्यायासाठी कोणाकडे पाहायचे?

बीड प्रकरणात १५४ प्रकरणांमध्ये तब्बल २४१ कोटी रुपयांचा वाढीव मोबदला मंजूर करण्यात आल्याचा आरोप आहे. बनावट स्वाक्षऱ्या, मागील तारखांचे आदेश, गायब फाईल्स आणि डिजिटल पुरावे हे सर्व चित्र पाहिले तर हा केवळ आर्थिक घोटाळा नसून प्रशासकीय व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर झालेला हल्ला आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात काही कोटी रुपये प्रत्यक्ष वितरितही झाल्याचे तपासात उघड झाले आहे. म्हणजेच भ्रष्टाचार केवळ कागदावरच नव्हे, तर प्रत्यक्ष व्यवहारात उतरला होता.

भारतात महसूल खात्यातील भ्रष्टाचार हा काही नवीन विषय नाही. जमीन, भूसंपादन, फेरफार, सातबारा, बांधकाम परवानग्या, जमीन अधिग्रहण, महसूल न्यायालये ‑ या प्रत्येक स्तरावर भ्रष्टाचाराच्या तक्रारी सातत्याने समोर येतात. देशभरात अनेक मोठी प्रकरणे गाजली. महाराष्ट्रातील आदर्श घोटाळा, उत्तर प्रदेशातील जमीन अधिग्रहण प्रकरणे, हरियाणातील जमीन बदल व्यवहार, नोएडा आणि गुरुग्राममधील जमीन गैरव्यवहार या सर्व घटनांमध्ये प्रशासनातील काही अधिकारी, राजकीय मंडळी आणि दलाल यांचे साटेलोटे दिसून आले.

महसूल प्रशासनाकडे केवळ कागदपत्रांचा अधिकार नसतो, तर तो थेट नागरिकांच्या जीवनाशी संबंधित असतो. एखाद्या शेतकऱ्याची जमीन, त्याचा मोबदला, त्याचा हक्क आणि त्याचे भविष्य हे महसूल अधिकाऱ्यांच्या निर्णयांवर अवलंबून असते. त्यामुळे या खात्यातील भ्रष्टाचार हा सामान्य भ्रष्टाचार नसून तो लोकांच्या जीवनावर परिणाम करणारा अपराध ठरतो.

सर्वात धोकादायक बाब म्हणजे अशा घोटाळ्यांमुळे शासन आणि प्रशासनावरील जनतेचा विश्वास ढासळतो. गावातील सामान्य शेतकरी किंवा नागरिक जेव्हा तहसील कार्यालयात जातो, तेव्हा त्याला न्याय मिळेल याची अपेक्षा असते. पण त्याच वेळी जर अधिकाऱ्यांवर कोट्यवधींचे घोटाळे, लाचखोरी, दलाली किंवा भोंदू बाबांशी संबंध असल्याचे आरोप होत असतील, तर प्रशासनाची नैतिक उंचीच कोसळते.

आजही ग्रामीण भागात महसूल कार्यालय म्हणजे भीती, दलाल आणि पैशांशिवाय काम न होणारी व्यवस्था अशीच प्रतिमा आहे. अनेक वेळा एखाद्या साध्या फेरफारासाठी, वारस नोंदीसाठी किंवा सातबारा उताऱ्यासाठी नागरिकांना महिनोन्महिने कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. दलालांशिवाय काम होत नाही, अशी भावना लोकांच्या मनात निर्माण झाली आहे. ही परिस्थिती लोकशाहीसाठी घातक आहे.

लाचखोरी आणि भ्रष्टाचार थांबवण्यासाठी शासन विविध पातळ्यांवर प्रयत्न करत आहे. डिजिटल प्रणाली, ऑनलाइन सेवा, ई-ऑफिस, सीसीटीव्ही यांसारख्या उपाययोजना राबवल्या जात आहेत. मात्र भ्रष्ट मानसिकता बदलल्याशिवाय केवळ तंत्रज्ञानाने प्रश्न सुटणार नाही. कायद्याची भीती आणि नैतिकतेची जाणीव या दोन्ही गोष्टी प्रशासनात रुजवाव्या लागतील.

विशेष म्हणजे अशा प्रकरणांमध्ये केवळ कनिष्ठ अधिकारी किंवा कर्मचारी दोषी नसतात. अनेकदा उच्च पदस्थ अधिकाऱ्यांवरही आरोप होतात. जिल्हाधिकारी आणि उपजिल्हाधिकारी यांसारखी पदे ही घटनात्मक जबाबदारीची असतात. त्या पदांवर बसणाऱ्या अधिकाऱ्यांकडून समाजाला अधिक प्रामाणिकपणा आणि संवेदनशीलतेची अपेक्षा असते. त्यामुळेच अशा अधिकाऱ्यांवर आरोप झाले की त्याचा परिणाम संपूर्ण व्यवस्थेवर होतो.

भोंदू बाबांशी अधिकाऱ्यांचे संबंध हा आणखी एक गंभीर सामाजिक प्रश्न आहे. एका उपजिल्हाधिकाऱ्याने एखाद्या भोंदू बाबाला शेकडो कॉल केल्याची चर्चा होत असेल, तर ग्रामीण भागातील अशिक्षित आणि अंधश्रद्धाळू समाजाची अवस्था काय असेल, याची कल्पना करता येते. प्रशासनाने विज्ञाननिष्ठ आणि कायद्याच्या चौकटीत राहून काम करणे अपेक्षित असताना अशा घटनांमुळे समाजात चुकीचे संदेश जातात.

या सर्व घटनांतून प्रशासनाने आणि शासनाने बोध घेण्याची गरज आहे. भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. तपास यंत्रणांनी निष्पक्षपणे काम करून दोषींना शिक्षा मिळवून दिली पाहिजे. त्याचबरोबर महसूल खात्याच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता वाढवणे, जबाबदारी निश्चित करणे आणि जनतेला सुलभ सेवा देणे ही काळाची गरज आहे.

कारण शेवटी प्रश्न फक्त काही कोटी रुपयांचा नाही, तर लोकशाहीवरील जनतेच्या विश्वासाचा आहे. कुंपणच शेत खात असेल, तर शेतकऱ्याने न्याय कोणाकडे मागायचा, हा प्रश्न आज सर्वसामान्य नागरिकांच्या मनात निर्माण झाला आहे.

# ओम शांती केंद्रात बाल व्यक्तिमत्व संस्कार शिबिराची सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** येथील प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय (ओम शांती केंद्र)येथे राजयोगिनी सरला दिदी यांच्या प्रेरणेने ६ ते १४ वयोगटातील मुलांसाठी आयोजित 'बाल व्यक्तिमत्व संस्कार शिबिराची उत्साहपूर्ण वातावरणात सांगता करण्यात आली.तीन दिवस चाललेल्या बाल व्यक्तिमत्त्व संस्कार शिबिरात सहभागी मुलामुलींनी केवळ मनोरंजनच नाही तर संस्कारांची मोलाची शिदोरी ही प्राप्त केली.मिळालेल्या संस्कारांच्या माध्यमातून आदर्श पिढी घडवा असे आवाहन राजयोगिनी सरला दिदी यांनी यावेळी बोलतांना केले.

सदर शिबिरात आदर्श जीवनमूल्ये आणि ध्यानाचा संस्कार याविषयी ब्रम्हाकुमारी राजयोगिनी वंदना दीदी यांनी मुलांना दररोज ध्यान (मेडिटेशन) शिकवून त्याचे महत्त्व पटवून दिले.तसेच मुलांनी आपले जीवन कसे आदर्श बनवावे यासाठी प्रेरणादायी जीवनमूल्यांचे सखोल मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे मुलांची एकाग्रता वाढण्यास मोठी मदत झाली.

आजच्या काळात मुलांमध्ये वाढलेल्या मोबाईलच्या व्यसनावर रामचंद्र बर्डे यांनी प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांनी मोबाईलचे दुष्परिणाम आणि मैदानी खेळांचे महत्त्व मुलांच्या मनावर बिंबवले. दिवसाची सुरुवात योगासने आणि प्राणायामाने करून मुलांच्या शारीरिक आरोग्यावर भर देण्यात आला.

मनोरंजनात्मक खेळ घेऊन मूल्यशिक्षण ही सदर शिबिरात देण्यात आले.शिबिर यशस्वीतेसाठी दिपाली शिरसाठ मॅडम,प्रमिला शिरसागर मॅडम,सुनीता पवार यांनी विशेष प्रयत्न केले.या प्रशिक्षणार्थींनी विविध मनोरंजनात्मक व मूल्यशिक्षण देणारे खेळ घेतले आणि संस्कारक्षम गोष्टींच्या माध्यमातून मुलांचे मनोरंजन करत मार्गदर्शन केले. प्रमिला शिरसागर यांनी शिबीर प्रसंगी सूत्रसंचालन केले.

शिबिराच्या सांगता समारंभाप्रसंगी मुलांनी स्टेजवर येऊन आपले मनोगत व्यक्त केले. मोबाईलची ओढ कमी होऊन योगा, मेडिटेशन आणि मैदानी खेळांची गोडी लागल्याचे अनेक मुलांनी आवर्जून सांगितले. शिबिराच्या दरम्यान दररोज मुलांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी विद्यालयाच्या संचालिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी सरला दीदीजी, पत्रकार सुधीर चव्हाण यांच्या हस्ते सहभागी मुलांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. सरला दीदीजी यांनी मुलांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देत ''संस्कारांच्या माध्यमातून आदर्श पिढी घडवा असे प्रतिपादन केले.



# पुखराज पिपाडा यांचा आदर्श तरुणांनी घ्यावा : डॉ. राजेंद्र पिपाडा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** ग्रामीण भागातील रुग्णांना रात्रीच्या वेळी स्वतः रुग्णालयात दाखल करून वेळेत उपचार मिळवून देत शेकडो लोकांचे प्राण वाचविणारे पुखराज पिपाडा यांचा आदर्श तरुण पिढीने घ्यावा, असे प्रतिपादन भाजपा नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी केले. गणेश परिसराच्या वतीने गुरुदेव दत्त पतसंस्थेचे माजी चेअरमन पुखराज पिपाडा यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्षा ममता पिपाडा, संघपती अनिल पिपाडा, रावसाहेब गाढवे, बाबासाहेब गोरे, नरेंद्र पिपाडा, ज्ञानेश्वर चौधरी, राजुशेठ मुनावत आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, व्यापारी, शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी पुखराज पिपाडा यांच्या सामाजिक, आर्थिक व सहकार क्षेत्रातील योगदानाचा गौरव करण्यात आला. आपल्या मनोगतात डॉ. पिपाडा म्हणाले की, पुखराज पिपाडा यांनी गुरुदेव दत्त पतसंस्था प्रामाणिकपणे व पारदर्शकपणे चालवत अनेक कुटुंबांना आर्थिक आधार दिला. समाजातील सर्वसामान्यांच्या अडचणींना धावून जाणारे त्यांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.ग्रामीण भागातील शेतकरी, छोटे व्यापारी व गरजू कुटुंबांना सहकाराच्या माध्यमातून मदत करून त्यांनी समाजात विश्वास व सेवाभाव निर्माण केला आहे. कार्यक्रमात पुखराज पिपाडा यांचा शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.



# ऑनलाईन औषध विक्रीविरोधात देशव्यापी बंद

## श्रीरामपूर तालुका केमिस्ट असोसिएशन आंदोलनात सहभागी होणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** देशभरात वाढत चाललेल्या बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्रीला आळा घालण्यासाठी तसेच कॉर्पोरेट कंपन्यांकडून निर्माण करण्यात येणाऱ्या अवाजवी व अव्यावसायिक स्पर्धेविरोधात अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने (अखजडू) दि. २० मे रोजी देशव्यापी बंदची हाक दिली आहे. या आंदोलनात श्रीरामपूर तालुक्यातील सर्व औषध विक्रेत्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन बंद यशस्वी करावा, असे आवाहन श्रीरामपूर तालुका केमिस्ट असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे. जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर, झोन सचिव शशांक रासकर, जिल्हा कार्यकारिणी सदस्य रवींद्र गुलाटी व बाळासाहेब ढेरंगे, श्रीरामपूर तालुका अध्यक्ष आनंद कोठारी, सचिव कोविल खेमनर आणि रवींद्र चौधरी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे हे आवाहन केले आहे. तसेच जालिंदर भवर, उदय बधे, उपाध्यक्ष माधव आसणे, प्रशांत कोठारी, सुजित राऊत, प्रशांत उचित, संदीप टुपके, कैलास चायल, ओमप्रकाश नारंग, निमंत्रित सदस्य राकेश साहनी, प्रदीप डावखर, प्रसाद कुंभकर्ण, महावीर कोठारी, अश्फाक शेख, रियाज पोपटीया, हुसेन खाटीक, शशिकांत गौड आणि दीपक उघडे आदी पदाधिकाऱ्यांनीही सर्व केमिस्ट बांधवांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

कायद्याचे उल्लंघन व सरकारी दुर्लक्षाचा आरोप संघटनेच्या माहितीनुसार, ऑनलाईन औषध विक्रीसंदर्भात सध्याच्या कायद्यात स्पष्ट तरतूद नसतानाही देशभरात मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन औषध विक्री सुरू आहे. केंद्र सरकारने २८ ऑगस्ट २०१८ रोजी 'जीएसआर ८१७ (ए)' अंतर्गत इंटरनेटच्या माध्यमातून औषध विक्रीबाबत अधिसूचना काढली होती. मात्र, या अधिसूचनेचे अद्याप कायद्यात रूपांतर झालेले नाही. दरम्यान, या विरोधात दिल्ली उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल असून न्यायालयाने ऑनलाईन औषध विक्रीला स्थगिती दिलेली आहे. तरीदेखील सरकारकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. त्यामुळे संबंधित अधिसूचना तातडीने रद्द करण्यात यावी, अशी मागणी औषध विक्रेत्यांकडून करण्यात आली आहे. कोरोना काळातील सवलतीचा गैरफायदा महामारीच्या काळात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी केंद्र सरकारने २६ मार्च २०२० रोजी 'जीएसआर २२० (ए)' अंतर्गत औषधांच्या होम डिलिव्हरीला विशेष परवानगी दिली होती. मात्र, कोरोना काळ संपून अनेक वर्षे उलटून गेल्यानंतरही ही अधिसूचना मागे घेण्यात आलेली नाही. याच सवलतीचा फायदा घेत मोठ्या ऑनलाईन कंपन्या प्रचंड आर्थिक ताकदीच्या जोरावर औषधांवर २० ते ५० टक्क्यांपर्यंत सवलत देत असल्याचा आरोप केमिस्ट संघटनांनी केला आहे.



यामुळे पारंपरिक औषध विक्रेत्यांचा व्यवसाय संकटात सापडला असून देशातील सुमारे १२.५० लाख औषध विक्रेत्यांचे अस्तित्व धोक्यात आले असल्याचे संघटनेने म्हटले आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी सांगितले की, नियमानुसार जीवनावश्यक औषधांवर घाऊक विक्रेत्याला ८ टक्के आणि किरकोळ विक्रेत्याला १६ टक्के नफा निश्चित आहे. तर अनियंत्रित औषधांवर होलसेलरला १० टक्के व रिटेलरला २० टक्के नफा मिळतो. असे असतानाही कॉर्पोरेट कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात सवलती देण्यात येत असल्याने पारंपरिक व्यवसाय अडचणीत आला आहे. सरकारच्या विविध मंत्रालयांना तसेच पंतप्रधान यांनाही निवेदने देऊन सकारात्मक निर्णयाची मागणी करण्यात आली होती. मात्र, कोणताही ठोस प्रतिसाद न मिळाल्याने अखेर देशव्यापी बंद पुकारण्यात आल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

### ऑनलाईन औषध विक्रीमुळे तरुण पिढी धोक्यात

ऑनलाईन औषध विक्रीच्या माध्यमातून बनावट व बोगस औषधांचा पुरवठा वाढत असल्याची गंभीर बाब समोर येत आहे. तसेच वैद्यकीय उपचारांसाठी वापरण्यात येणाऱ्या काही विशिष्ट औषधांचा व इंजेक्शन्सचा तरुणांकडून नशेसाठी गैरवापर होत असल्याची चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रत्यक्षात डॉक्टरांच्या अधिकृत प्रिस्क्रिप्शनशिवाय अशी औषधे विक्री करणे किंवा खरेदी करणे हा कायद्याने गंभीर गुन्हा आहे. मात्र, ऑनलाईन विक्रीत अशा औषधांवर कोणतेही प्रभावी नियंत्रण नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. देशाच्या तरुण पिढीचे भविष्य वाचवण्यासाठी ऑनलाईन औषध विक्री तात्काळ बंद करणे आवश्यक असल्याचे मत जिल्हा कार्यकारिणी सदस्य रवींद्र गुलाटी यांनी व्यक्त केले.

# मुस्लिम समाजासाठी स्टडी सेंटरची उभारणी करणार : आ. हेमंत ओगले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** मुस्लिम समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढणे आवश्यक आहे त्यासाठी करिअर गायडन्स सारखे प्रोग्राम मार्गदर्शक ठरतात. नगरपालिका निवडणुकीत आश्वासन दिल्याप्रमाणे लवकरच मिल्लत नगर परिसरामध्ये पठाण सरांच्या मागणीनुसार बहुउद्देशीय सभागृह व स्टडी सेंटर ची उभारणी करण्यात येईल. यासाठी शासनाच्या योजना व आमदार निधीतून भरघोस सहकार्य करण्यात येईल याचा सुरुवात म्हणून दहा लाख रुपयांचा निधी मी आजच जाहीर करीत आहे असे प्रतिपादन आमदार हेमंत तात्या ओगले यांनी केले. महाराष्ट्र पठाण समाज सेवा संघ यांच्या वतीने श्रीरामपूर शहरात प्रथमच भव्य करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. १०वी, १२वी, डिप्लोमा, डिग्री तसेच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार ओगले बोलत होते. याप्रसंगी मुफ्ती रिजवान,नगरपालिका काँग्रेस पक्षाचे गट नेते मुजफ्फर शेख,नगरसेवक अंजुमभाई शेख,मुन्ना पठाण,जावेद शेख,शाहिद कुरेशी,कलीम कुरेशी,माजी नगरसेवक मुख्तार शाह,साजिद मिर्झा,शहर काजी मौलाना अकबर अली,मोहम्मदरफीक शेख, डॉक्टर मोहसीन शेख,डॉक्टर तोफिक शेख,सुप्रसिद्ध करियर कौन्सिलर अनिस कुट्टी,इरफान सय्यद, डॉ.

**सव्वा पाच तास चाललेल्या या कार्यक्रमात मुस्लिम समाजाचे विद्यार्थी विशेषता मुली व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.विविध क्षेत्रातील तज्ञांनी यावेळी करिअर साठी असलेल्या अनेक प्रकारच्या संधी समजावून सांगितल्या.श्रीरामपूर शहरात मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांसाठी भव्य असा हा कार्यक्रम पहिल्यांदाच झाला त्यामुळे अनेकांनी पठाण सेवा संघाला धन्यवाद दिले.**

==================================

दीपेश रसाळ, डॉ.एहतेशामुद्दीन सय्यद,गोविंद ठोंबरे, एहसान सय्यद,हाफिज शेख,रिजवान शेख या विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी सूर्यदत्ता सायबर सिक्युरिटी कॉलेजचे माजी प्राचार्य अरिफ शेख होते. संरक्षण सेवा,वैद्यकीय क्षेत्र, पोलीस सेवा,अभियांत्रिकी, नागरी सेवा, तसेच करिअर काउन्सेलिंग यासह अनेक क्षेत्रांतील संधींबद्दल विस्तृत माहिती देण्यात आली. या कार्यक्रमात विशेषतः स्पर्धा परीक्षांच्या तयारीच्या पद्धती, शैक्षणिक संधी, योग्य विषय निवड, तसेच भविष्यातील विविध करिअर मार्ग याबाबत विद्यार्थी व पालकांचे प्रश्न सोडविण्यात आले. ग्रामीण आणि उपनगरातील विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शनाची दारे खुली व्हावीत, हा संघाचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाला शहरातील मान्यवर, पालक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. महाराष्ट्र पठाण समाज सेवा संघाचा हा उपक्रम शैक्षणिक आणि सामाजिक दृष्ट्या कौतुकास्पद ठरला. याप्रसंगी दहावी आणि बारावीच्या परीक्षेत ८० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या ३८ विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रस्ताविक पठाण सेवा संघाचे राज्य अध्यक्ष सलीमखान पठाण यांनी केले.सूत्रसंचालन रज्जाक पठाण यांनी केले तर आभार कार्याध्यक्ष रफिक पठाण यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री.हाजी शरीफखान पठाण, मोहसीन पठाण,अकबर पठाण,अमजद पठाण,फिरोज पठाण,जुनेद पठाण,अशपाक पठाण भैय्या,रफिक शफिक पठाण,अरबाज पठाण,जावेद याकूब पठाण,फिरोज युसुफ पठाण,इम्तियाज पठाण,भैय्या पठाण,रियाज पठाण,शोएब पठाण, इसाक पठाण,एम एम पठाण,रियाज अब्दूल पठाण,राजमोहम्मद पठाण,ॲड मोहसीन पठाण,इमदाद पठाण,अबूजर पठाण,रफिक शरीफ पठाण समद पठाण,जुलेखा पठाण,कहेकशा पठाण,अरिबा पठाणआदींनी विशेष परिश्रम घेतले.

# कहार समाजाच्या सामाजिक उपक्रम मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** 'कहार कर्मचारी समाजसेवा ट्रस्ट'च्या वतीने सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने विविध सामाजिक उपक्रम मेळाव्याचे आयोजन नेवासा तालुक्यातील प्रवरासंगम येथे करण्यात आले होते. सदर मेळाव्यात वधू-वर परिचय,युवक-युवती मार्गदर्शन, गुणवंतांचा सत्कार,शासकीय व निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांचा असे विविध उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.मेळाव्याला अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक,पुणे,बीड, जालना या जिल्ह्यातून अंदाजे ५०० हून अधिक समाज बांधव उपस्थित होते. उपस्थितांमध्ये समाजातील तरुण-तरुणी त्यांचे पालक, मित्रमंडळी, नातेवाईक, आप्तेष्ट, विविध क्षेत्रातील



पदाधिकारी, कार्यकर्ते, शासकीय, निम शासकीय, खाजगी क्षेत्रातील नोकरदार मंडळी, समाजातील प्रतिष्ठित डॉक्टर, वकील, इंजिनिअर, मच्छीमार व शेतकरी बांधवांचा समावेश होता यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी मुंबादेवीच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकामध्ये प्रा. रामनाथ वाढे यांनी केले. ट्रस्टच्या वतीने आजवरच्या वाटचालीचा आणि कार्यक्रमाच्या आढावा घेतला. युवक प्रतिनिधी कुमारी प्रेरणा अरुण लिंबोरे हिने 'जशा जुन्या पिढीच्या नवीन पिढीकडून अपेक्षा असतात तशा नवीन पिढीच्या जुन्या पिढीकडून अपेक्षा' या विषयावर आणि स्त्री-पुरुष समानतेवर परखड मत मांडले. दिवसभर चाललेल्या या भरगच्च कार्यक्रमात समाजातील तरुण पिढीसाठी स्पर्धा परीक्षा, रोजगार आणि स्वयंरोजगार याविषयी तज्ज्ञांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती देऊन समाज बांधवांमध्ये जनजागृती करण्यात आली. समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून ट्रस्ट मार्फत ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. वधू-वर परिचय सत्रात अनेक युवक-युवतींनी आणि त्यांच्या पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी ८६ वधू-वरांनी आपली नोंदणी केली. तसेच शासकीय व निमशासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या ४२ अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी कहार कर्मचारी समाजसेवा ट्रस्टचे अध्यक्ष संतोष पंडुरे,उपाध्यक्ष स्मिता तुंबारे, सचिव मोहिनीराज सारगैय्ये प्रांजली तुंबारे.वीश्वंभर कुंठे, किशोर बीरुटे, गंगाधर रासने, चंद्रकांत कहार, संदीप पांडव, डॉ. सुनील केशव तुंबारे, चरणसिंग कुंठे, पोलीस निरीक्षक जालिंदर पंडोरे, डॉ अरविंद तुंबारे, बजरंग लिंबोरे, जगदीश तुंबारे कृषी अधिकारी, कुलगुरु डॉ. अशोक ढगे, अरुणलाल लिंबोरे, संतोष कुंडारे, पोपटराव बिरुटे, नानासाहेब लकारे,शिवा लकारे,प्रकाश पंडोरे, विठ्ठल पांडव,पोपट लिबोरे, कुंदन डिंबर उपस्थित होते सूत्रसंचालन लक्ष्मण परसैया यांनी तर प्रा. काकासाहेब लकारे यांनी आभार मानले.

# उत्कृष्ट समाज घडवण्यासाठी 'पंच परिवर्तना'ची गरज : अग्निहोत्री

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** जिल्ह्यातील श्रीरामपूर येथे ''राष्ट्राचा आणि समाजाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल, तर केवळ विचार करून चालणार नाही, तर प्रत्यक्ष कृतीची गरज आहे. आजचा समाज अधिक प्रगल्भ, संवेदनशील आणि सुदृढ बनवण्यासाठी 'पंच परिवर्तन' ही काळाची गरज आहे,'' असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत प्रचार प्रमुख अतुल अग्निहोत्री यांनी येथे केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'संघशताब्दी मंथन - परिवर्तनाच्या दिशेने' या जिल्हास्तरीय प्रमुखजनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन रविवारी (ता. १७) श्रीरामपूर येथील निर्मळ संकुलात करण्यात आले होते. या वेळी मुख्य वक्ते म्हणून अतुल अग्निहोत्री ते बोलत होते. व्यासपीठावर संघाचे ज्येष्ठ प्रचारक लक्ष्मीनारायण भाला (दिल्ली) आणि उत्तर अहिल्यानगरचे जिल्हा संघचालक किशोर निर्मळ उपस्थित होते. अग्निहोत्री यांनी आपल्या संबोधनात पंच परिवर्तनातील सामाजिक समरसता, पर्यावरण संवर्धन, कुटुंब प्रबोधन, स्व-बोध (स्वत्वाचा भाव) आणि नागरी शिष्टाचार या पाच मुख्य सूत्रांवर प्रकाश टाकला. हे विषय केवळ उपदेशाचे नसून, दैनंदिन जीवनात आणि समाजात त्यावर प्रत्यक्ष कृती कशी करता येईल, याची उदाहरणे त्यांनी दिली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात त्यांनी उपस्थित मान्यवरांशी संवाद साधत




विविध शंकांचे निरसन केले. ज्येष्ठ प्रचारक लक्ष्मीनारायण भाला यांनी संघाच्या कार्यपद्धतीचा आणि विविध आयामांचा आढावा घेतला. भारतीय संस्कृतीतील 'वसुधैव कुटुंबकम्' या संकल्पनेचा संदर्भ देत त्यांनी देशाच्या उभारणीसाठी आणि प्रगतीसाठी प्रत्येक नागरिकाने राष्ट्रकार्यात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. प्रारंभी, दीपप्रज्वलन आणि भारतमाता पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. उत्तर अहिल्यानगरचे जिल्हा प्रचार प्रमुख मंगेश भिडे यांनी प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत केले. श्रीरामपूर तालुका प्रचार प्रमुख महेश तारगे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. या 'शताब्दी मंथन' कार्यक्रमाला उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यातील पत्रकार, संपादक, साहित्यिक, शास्त्रज्ञ, कलावंत, कायदेतज्ज्ञ आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा संपर्कप्रमुख डॉ. प्रणव जोशी यांनी सूत्रसंचालन केले. मंगेश भिडे यांनी आभार मानले. जिल्हा सह बौद्धिक प्रमुख विजयराव ढोले व वाद्यवृंदाच्या सामूहिक 'वंदे मातरम' गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# कृषि नवोन्मेष व उष्मायन केंद्र नवसंशोधन व कृषि उद्योजकतेसाठी प्रभावी व्यासपीठ : मुख्यमंत्री फडणवीस

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे येथे उभारण्यात येणारे कृषि नवोन्मेष आणि उष्मायन केंद्र हे राज्यातील कृषि क्षेत्रातील नवसंशोधन, तंत्रज्ञान विकास आणि कृषि उद्योजकतेसाठी प्रभावी व्यासपीठ ठरणार असल्याचा विश्वास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ऊर्शींशपवीर त्र्रवपर्रीळी यांनी व्यक्त केला. पुणे कृषि महाविद्यालय परिसरात उभारण्यात येणाऱ्या या केंद्राच्या प्रकल्पाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते मार्गदर्शन करत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील कृषि क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे ही काळाची गरज आहे.

संशोधन प्रयोगशाळांमध्ये विकसित होणारे तंत्रज्ञान प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. या नवोन्मेष आणि उष्मायन केंद्राच्या माध्यमातून विस्तारक्षम, विक्रीयोग्य आणि उत्पादनवाढीस पूरक ठरणाऱ्या संशोधनाला चालना मिळेल. तसेच कृषि क्षेत्रात स्टार्टअप संस्कृती विकसित होऊन युवकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत क्कपाटील, कृषिमंत्री तथा महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रतिकुलपती दत्तात्रय बाराने, राज्यसभेच्या खासदार मेधा कुलकर्णी, विधान परिषद सदस्य आमदार योगेश टिळेकर, आमदार हेमंत रासने, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक राहुल महिवाल, कृषि आयुक्त सुरज मांढरे, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, कृषि पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीचे सभापती अमोल नलावडे, महात्मा



फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, कार्यकारी परिषदेचे सदस्य दत्तात्रय उगले, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, विभागीय कृषि सहसंचालक दत्तात्रय गवसाने, विद्यापीठ अभियंता मिलिंद ढोके, सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुभाष भालेकर, सहयोगी संशोधन संचालक डॉ. डी. बी. लाड, आत्मा प्रकल्प संचालक सुरज मडके व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी संजय काचोळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

गेल्या वर्षी आयोजित ग्री हॅकथॉन कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांनी कृषि महाविद्यालय, पुणे येथे कृषि नवोन्मेष आणि उष्मायन केंद्र स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्या घोषणेच्या पूर्ततेसाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा नियोजन व विकास समितीच्या निधीतून कृषि महाविद्यालय परिसरातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या इमारतीच्या नूतनीकरण व संवर्धनासाठी सुमारे ४ कोटी १७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

यावेळी कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केंद्राची उद्दिष्टे स्पष्ट करताना सांगितले की, हे केंद्र कृषि क्षेत्रातील तंत्रज्ञानाचे व्यापारीकरण, नवीन संशोधनाचे पेटंट, त्याचे प्रमाणीकरण व बाजारपेठेत सादरीकरण यासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल. नवोदित उद्योजकांना कृषि वैज्ञानिक, उद्योगतज्ज्ञ व व्यावसायिक सल्लागार यांची जोड देऊन पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

तसेच कृषि विद्यापीठे, संशोधन संस्था, कॉर्पोरेट कंपन्या, धोरणकर्ते व शेतकरी उत्पादक कंपन्या यांच्यात समन्वय साधणारा दुवा म्हणून हे केंद्र कार्य करेल, असे त्यांनी सांगितले. अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांनी सांगितले की, या केंद्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, हवामान बदलास पूरक शेती, अचूक शेती तंत्रज्ञान, ड्रोन तंत्रज्ञान, प्रगत सिंचन व्यवस्था, जैविक शेती, प्रगत शेती अवजारे, कार्बन क्रेडिट, व्यापार तंत्रज्ञान, शाश्वत शेती आणि कृषि आधारित आर्थिक तंत्रज्ञान यांसारख्या आधुनिक संकल्पनांवर विशेष भर दिला जाणार आहे. सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुभाष भालेकर यांनी सांगितले की, या केंद्राचे भागीदार विविध कृषि शैक्षणिक व संशोधन संस्था असतील. ग्री हॅकथॉनमधील विजेते, नवकल्पक विद्यार्थी, स्टार्टअप उद्योजक, शेतकरी उत्पादक संस्था, सहकारी संस्था आणि कृषि पदवीधरांना या केंद्राचा लाभ होणार आहे.

कार्यक्रमास महाराष्ट्र कृषि तंत्रज्ञ संस्थेचे अध्यक्ष व डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. किसन लवांडे, माजी कृषि आयुक्त डॉ. उमाकांत दांगट, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वेंकट मायंदे, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राजाराम देशमुख, महासचिव डॉ. सुदाम अडसूळ तसेच कृषि महाविद्यालय पुणेचे प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## द•ख•ल

### कोल्हार येथे रामकथेऐवजी ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन

**कोल्हार** : अधिक मास (पुरुषोत्तम मास) निमित्त कोल्हार येथे आयोजित करण्यात आलेला रामकथेचा भव्य कार्यक्रम रद्द करून त्याऐवजी १ जून ते ८ जून दरम्यान ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अ‍ॅड. सुरेंद्र खर्डे पाटील यांनी दिली. येथील भगवती माता मंदिराच्या सभामंडपात सोमवारी सकाळी झालेल्या कोल्हार भगवतीपुर देवालय ट्रस्ट व ग्रामस्थांच्या संयुक्त बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. तीन वर्षांपूर्वी अधिक मासात महंत रामगिरी महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून भागवत कथेचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला होता. मात्र, यावर्षी निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे शेतकरी, व्यापारी व सर्वसामान्य नागरिक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत यंदाचा धार्मिक कार्यक्रम साधेपणाने व कमी खर्चात करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे रामकथेऐवजी ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व काल्याचे कीर्तन असे कार्यक्रमाचे स्वरूप निश्चित करण्यात आले. कार्यक्रमासाठी वर्गणी ऐच्छिक ठेवण्यात आली आहे. बैठकीस ट्रस्टचे पदाधिकारी, विश्वस्त व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सरकारी कामात अडथळा व मारहाण आरोप प्रकरणी

## माजी सरपंच तुकाराम गुंजाळ सह दहा जणांची निर्दोष मुक्तता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील चिलेखनवाडी येथील माजी सरपंच तुकाराम महादू गुंजाळ यांच्यासह दहा जणांची सरकारी कामात अडथळा व मारहाण आरोप प्रकरणी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.नेवासा येथील जिल्हा सत्र न्यायाधीश हरिभाऊ वाघमारे यांनी हा निकाल दिला आहे. वरील आरोपींच्या वतीने जेष्ठ विधी तज्ञ अँड. गोकुळ भताने यांनी या प्रकरणी प्रभावीपणे युक्तिवाद केला.

याबाबत अधिक माहिती अशी की चिलेखनवाडी गावचे तत्कालीन सरपंच भाऊसाहेब धोंडीराम सावंत यानी नेवासा पोलीस ठाण्यात तुकाराम गुंजाळ व इतर १० जणांविरुद्ध गैरकायदयाची मंडळी जमवुन मारहाण करणे व सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल केला होता. सदर गुन्हा र.नं.३९/२०२० चा तपास करून पोलिसांनी तुकाराम महादू गुंजाळ,एकनाथ महादू गुंजाळ (मयत), किरण एकनाथ गुंजाळ, नितीन एकनाथ गुंजाळ, संजय पंढरीनाथ गुंजाळ, रोहिदास भगवान गुंजाळ, नवनाथ भानुदास गुंजाळ, सुखदेव एकनाथ पवार,राजेंद्र सुखदेव पवार,दिलीप एकनाथ पवार, सर्व रा. चिलेखानवाडी, ता. नेवासा या १० आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र नेवासा येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल केले होते. जिल्हा व सत्र न्यायाधीश हरिभाऊ वाघमारे यांच्या समोर सुनावणी झाली.सरकारी पक्षातर्फे एकूण ६ साक्षीदार तपासण्यात आले. आरोपींच्या वतीने ड. गोकुळ भताणे यांनी प्रभावीपणे युक्तिवाद करून सरकारी पक्षाच्या वतीने तपासण्यात आलेल्या ६ साक्षीदारांच्या साक्षीमध्ये असलेली विसंगती न्यायालयलयाचे निदर्शनास आणून दिले.

आरोपीं विरुद्ध सबळ पुरावा नसल्याने न्यायालयाने आरोपी क्रमांक १ आणि ३ ते १० यांना, भारतीय दंड संहितेच्या कलम १४३, १४८, ३५३, ३२३, २६९, २७०,५०४,५०६ (कलम १४९ सहवाचले जाणारे) आणि २०१ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यांतून भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २५८(१) अन्वये निर्दोष मुक्तता केली आहे. आरोपींच्या वतीने ड. गोकुळ भताने यांनी काम पाहिले.

# दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त, आरोग्यास धोका

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**चांदा** : नेवासा तालुक्यातील चांदा येथे मुळा उजवा कालव्या जवळ काही लोक कचरा पेटवून देतात परंतु त्या मध्ये कोंबड्यांची पंख किंवा अन्य काही दुर्गंधीयुक्त स्राव त्यामध्ये टाकतात. त्यामुळे खूप अती भयानक घान दुर्गंधीयुक्त वास या परिसरात येतो. यासर्व प्रकारामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे या परिसरात व्यावसाय करणारे व्यावसायिकांना व रहिवाशांचा आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून ज्या वेळेस हवा असते त्यावेळेस या दुर्गंधीयुक्त वासामुळे अक्षरश: मळमळ उलट्या किंवा त्या ठिकाणाहून कुठेतरी लांब जावयास वाटते असा हा भयंकर दुर्गंधीयुक्त वास येतो तसेच या परिसरातील रहिवाशांना ही याबाबत खूप त्रास होतो. हा पेटलेला कचरा वादळात उडतो व कालव्यातील पाण्यात पडतो.

त्यामुळे पाणी देखील दुशित होण्याचा ही धोका निर्माण झाला आहे. आरोग्य विभागाला या विषयी कळविले तसेच प्रशासकीय स्तरावर देखील या बाबत लेखी स्वरूपात कळविले असून अनेक नागरीकांच्या सह्यांचा अर्ज तयार केला व त्या अर्जात त्यांनी असे नमूद केले आहे की ही दुर्गंधी इतकी दूर येत आहे की २४ तास सतत परिसरात दुर्गंधी असून गावातील नागरिकांचे दैनंदिन जीवन पूर्णपणे त्रस्त झाले आहे या घाणेरड्या परिस्थितीमुळे आम्हाला पुढील गंभीर आरोग्याची समस्या उद्भवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. डोकेदुखी, पोटाचे विकार, श्वसनाचा त्रास दम लागणे, खोकला, मळमळ तीव्र उलट्या इत्यादी आजार उद्भवण्याचा धोका वाढू लागला आहे. ही समस्या अत्यंत गंभीर बनली असून यामुळे गावातील लहान मुले वृद्ध नागरिक तसेच आजारी व्यक्ती यांच्या आरोग्याबाबतीत मोठा धोका निर्माण झाला आहे. तसेच गावामध्ये देखील रोगराई पसरण्याची शक्यता वाढली आहे तरी संबंधित आरोग्य विभागाने व प्रशासकीय यंत्रणाने कृपया या प्रकरणाचे तातडीने दखल घेऊन संबंधीतावर कठोर कारवाई करावी व त्या दुर्गंधीयुक्त वासाची विल्हेवाट लावावी.

तसेच परिसराची स्वच्छता करावी आरोग्य विषयक उपायोजना त्वरित राबवावी अशी मागणी या अर्जामध्ये नमूद केलेली असून तो अर्ज देखील संबंधित विभागास प्रदान केलेला आहे. जर भविष्यात या परिसरात रोगराई वाढल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशासनांवर व आरोग्य विभागावर राहील म्हणून तातडीने या येणाऱ्या दुर्गंधीयुक्त वासाचा बंदोबस्त करावा व आम्हाला या वासातून मुक्त करावे अशी मागणी परिसरातील नागरिकांनी व व्यावसायिकांनी केली आहे.

# पायरेन्सच्या आयबीएमएच्या विद्यार्थ्यांची जागतिक भरारी

## आंतरराष्ट्रीय कंपनीत दोन विद्यार्थ्यांना १३.५६ लाखाचे पॅकेज..

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आता आंतरराष्ट्रीय पंख फुटू लागले असून, पायरेन्स आयबीएमएने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची जागतिक पातळीवर छाप उमटवली आहे. संस्थेच्या एमबीए विभागातील विद्यार्थी रितिक गायकवाड आणि ओंकार वर्पे यांनी सेंट्रल आफ्रिकेतील अँगोला देशात नोकरी मिळवत संस्थेच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे, अशी माहिती ट्रेनिंग व प्लेसमेंट ऑफिसर प्रा. रेणुका तनपुरे यांनी दिली.

हायफ्लेक्स कॉमर्सिओ जेराल (डण) एल.डी.ए., लुआंडा, अँगोला या नामांकित आंतरराष्ट्रीय कंपनीमध्ये या दोन्ही विद्यार्थ्यांची बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर पदावर निवड झाली असून, त्यांना वार्षिक तब्बल १३.५६ लाखांचे आकर्षक वेतन मिळाले आहे. ग्रामीण पार्श्वभूमीतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी जागतिक व्यावसायिक क्षेत्रात झेप





घेतल्याने संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा आणि कौशल्यांचा प्रत्यक्षात प्रभावी वापर करत या विद्यार्थ्यांनी मेहनत, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यशाची नवी उंची गाठली आहे. पायरेन्स आयबीएमएमध्ये दिले जाणारे उद्योगाभिमुख शिक्षण, आधुनिक व्यवस्थापन कौशल्य प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास, इंग्रजी संभाषण कौशल्य, कॉर्पोरेट इंटरव्ह्यू तयारी आणि प्लेसमेंट सेलचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक संधी मिळत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पायरेन्स आयबीएमएचे संचालक डॉ. मोहसीन तांबोळी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर यश मिळवणे ही केवळ विद्यार्थ्यांची नव्हे, तर संपूर्ण संस्थेची अभिमानास्पद बाब आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत जागतिक स्पर्धेसाठी सक्षम बनविण्याचा आमचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. या अभूतपूर्व यशामुळे पायरेन्स आयबीएमएच्या प्लेसमेंट कामगिरीत आणखी एक सुवर्णपान जोडले गेले असून, परिसरातील विद्यार्थी व पालकांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला आहे. ग्रामीण भागातील युवकांनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी चिकाटीने प्रयत्न केल्यास आंतरराष्ट्रीय स्तरावरही यश संपादन करता येते, याचे हे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.

# कष्ट, जिद्द व चिकाटी असल्यास यश निश्चित : शिवाजीराव कपाळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : दहावी, बारावी आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव करत साई आदर्श मल्टीस्टेटच्या वतीने गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना यशासाठी कष्ट, शिस्त आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे महत्त्व पटवून देत त्यांचा सन्मान करण्यात आला. दहावी, बारावी तसेच विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक साई आदर्श मल्टीस्टेटचे संस्थापक शिवाजीराव कपाळे यांनी केले.

यावेळी बोलताना शिवाजीराव कपाळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी कष्ट, जिद्द आणि चिकाटी या त्रिसूत्रीचा अवलंब करणे आवश्यक आहे. सातत्यपूर्ण प्रयत्न आणि मेहनतीमुळे कोणतेही ध्येय साध्य करता येते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले मंत्रालयातील माजी अधिकारी दत्ता कडू यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



करताना गुणवत्ता, शिस्त आणि मेहनतीच्या बळावर विद्यार्थी निश्चितच यशाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचू शकतात, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी व्यासपीठावर साई आदर्श पतसंस्थेच्या चेअरमन सौ. संगीता कपाळे, माजी नगराध्यक्षा ज्योतीताई त्रिभुवन,संचालक अविनाश साबरे, योग प्रशिक्षक किशोर थोरात, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य बाबासाहेब शिरसाठ सर तसेच योगेश आंबेडकर, अजित येवले, रामेश्वर तोडमल, हॉलीबॉल चे प्रशिक्षक राजेंद्र पुजारी, सुनील संचेती आणि अन्सार शेख, दत्तात्रय गोपाळे,मॅनेजर सचिन खडके आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात दहावी-बारावी परीक्षेत उत्कृष्ट यश मिळविलेल्या विद्यार्थी तसेच हॉलीबॉल स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे नेतृत्व करणाऱ्या कर्णधार सानिका कोबरने व शिवनेरी क्लबच्या खेळाडूंचाही सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार रफिक शेख यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी साई आदर्श मल्टीस्टेटच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# नेवासा उपनगरात विविध विकास कामांचा शुभारंभ

## विकासासाठी काम करा,निधी आणण्याची जबाबदारी माझी : आ. लंघे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : शहरातील उपनगरात आ. विठ्ठलराव लंघे यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर झालेल्या सुमारे ७७ लाख रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचा शुभारंभ अधिक मासाच्या शुभारंभ प्रसंगी करण्यात आला.पावन गणपती मंदिर,मध्यमेश्वरनगर, काझीनगर,गांधीनगर येथे झालेल्या शुभारंभ कार्यक्रम प्रसंगी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.नेवासा ही ऐतिहासिक संत भूमी असल्याने या नेवासा शहराच्या विकासासाठी हातात हात घालून काम करा,निधी आणण्याची जबाबदारी माझी राहील असे आवाहन आ. लंघे यांनी सर्व प्रभागातील नगरसेवकांना केले.



(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)

नेवासा येथील फाटा रस्त्यावर असलेल्या प्रभाग क्रमांक तीन मधील पावन गणपती मंदिर प्रांगणातील संरक्षक भिंतीसाठी सुमारे दहा लाख रुपये,प्रभाग क्रमांक पाच मधील गांधीनगर व परिसरातील रस्त्यांसाठी ४० लाख, काझीनगर येथील नवीन डीपीसाठी आठ लाखांची तर मध्यमेश्वरनगर येथील अंतर्गत रस्त्यांसाठी १९ लाख असे एकूण ७७ लाखांची तरतूद असलेल्या विकास कामांचा शुभारंभ रविवारी दि.१७ मे रोजी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मध्यमेश्वरनगर येथील सुर्यमुखी मारुती मंदिर प्रांगणात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नेवासा मार्केट कमिटीचे माजी सभापती शंकरराव लोखंडे हे होते.तर नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले,नगरसेवक अंकुश म्हस्के,नगरसेवक महेश लोखंडे,नगरसेवक संभाजी धोत्रे,नगरसेवक प्रविण सरोदे,निरंजन डहाळे, संदीप सरकाळे,कृष्णा परदेशी,अनिल पवार व्यासपीठावर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे नगरसेवक अंकुश म्हस्के यांनी स्वागत केले.

नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांनी प्रास्ताविक करत भरीव निधीची तरतूद उपनगरासाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार लंघे पाटील यांना धन्यवाद दिले.मध्यमेश्वर परिसरातील प्रभागाच्या वतीने नगरसेवक संभाजी धोत्रे यांनी रस्ता कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार विठ्ठलराव लंघे यांचा सत्कार केला.परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने ही सन्मान करण्यात आला. यावेळी बोलतांना आ.विठ्ठलराव लंघे पाटील म्हणाले की नेवासा शहर ही ऐतिहासिक भूमी आहे, शहराला बदलायचे असेल तर सर्वांनी हातात हात घालून काम करण्याची गरज आहे,विकास कामाच्या माध्यमातून शहर व परिसराला उत्कर्षाकडे न्यायचे आहे,माझे राजकारण निवडणुकी पुरतेच असून आता ८० टक्के समाज कारणातून तालुक्याला पुढे नेण्यासाठी मला सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

नगरसेवकांच्या कामात ढवळाढवळ करण्याची मला सवय नाही,भविष्यकाळात काळजीपूर्वक पद्धतीने काम करायचे आहे त्यामुळे विकासासाठी राजकारणाच्या पलीकडे जाऊन पुढे या असे आवाहन त्यांनी यावेळी बोलतांना केले. नेवासा शहरातील कोणताही प्रभाग विकासापासून वंचित रहाणार नाही,मूलभूत सुविधा नागरिकांना मिळाल्या पाहिजे,लवकरच नवीन पाणी योजनेच्या कामाला पालकमंत्री नामदार विखे पाटील यांच्या हस्ते शुभारंभ करणार आहोत,सद्याचा पाणी प्रश्न जटिल आहे,नवीन पाणी योजना कार्यान्वित होईपर्यंत जुन्या योजनेतून जागृत राहून पाणी द्यावे लागणार आहे सर्वांना बरोबर घेऊन नवीन पाणी योजना ही सुरू करू अशी ग्वाही त्यांनी यावेळी बोलतांना दिली.

जे नागरिक अनेक वर्षांपासून शासकीय जागेवर रहातात ती अतिक्रमणे नियमाकुल करण्यासाठी काही त्रुटी असल्यास त्या कमी करण्याच्या दृष्टीने मार्ग काढू शासकीय जागा लाभार्थ्यांच्या नावावर होण्यासाठी जिल्हाधिकारी यांची तारीख घेऊन आपल्या सर्वांना बरोबर घेऊन चर्चा करण्यास तयार आहे याबाबत नक्कीच तोडगा काढू अशी ग्वाही त्यांनी यावेळी बोलतांना दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष शंकरराव लोखंडे पाटील म्हणाले की नगरपंचायत मार्फत बांधण्यात आलेले गाळे हे न्याय प्रविष्ट आहे.

त्यामध्ये तोडगा काढून ते त्वरित कार्यान्वित केल्यास नेवासा व्यापारवृद्धीला चालना मिळु शकेल त्यासाठी आ.विठ्ठलराव लंघे पाटील यांनी लक्ष घालून पुढाकार घ्यावा असे आवाहन केले यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी जेष्ठ कार्यकर्ते रामभाऊ केंदळे, जालिंदर डोंगरे,युवा नेते पिंटूभाऊ म्हस्के, संदीप म्हस्के, सुनील धोत्रे, सचिन वडागळे, भाजप सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष आदिनाथ पटारे,सुशील धायजे, बंडू शिंदे, प्रसाद चौधरी, गोरक्षनाथ बेहळे, गंगाराम दगडे, संजय पोकळे, नंदू काळे,गोविंद चव्हाण, भैय्या शेख, रमेश डुकरे, रिक्की शेख, सचिन देवरे, सुनील गरुड यांच्यासह मध्यमेश्वरनगर येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.नगरसेवक निरंजन डहाळे यांनी आभार मानले.

# एनपीटीईएल परीक्षेत प्रवरा अभियांत्रिकीच्या सानिका लव्हाटेचे यश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉक्टर बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय, लोणी येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थिनी कु. सानिका सोमनाथ लव्हाटे हिने राष्ट्रीय स्तरावरील एनपीटीईएल (छझढएङ) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. इंटरनेट क्राईम्स अँड सायबर सिक्युरिटी या अभ्यासक्रमामध्ये तिने १०० पैकी १०० गुण मिळवत शतप्रतिशत यश मिळविले आहे.

अशी माहीती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी माहिती देत विद्यार्थिनीच्या मेहनतीचे आणि गुणवत्तेचे कौतुक केले. तसेच या यशाबद्दल संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता ताई विखे पाटील यांच्या हस्ते कु. सानिका लव्हाटे हिचा विशेष सत्कार करण्यात आला. आपल्या यशाचे श्रेय देताना कु. सानिका हिने महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन, शैक्षणिक वातावरण आणि सातत्यपूर्ण अभ्यास यामुळे हे यश मिळाल्याचे सांगितले. विशेष म्हणजे सानिका लव्हाटे ही प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनियरिंग विभागाच्या विभागप्रमुख डॉ. सीमा लव्हाटे तसेच महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक प्रा. सोमनाथ लव्हाटे यांची कन्या आहे. विद्यार्थिनीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अभिनंदन केले आहे.

# महिलेचे दागिने चोरीला खानापूर येथील घटना

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : घराच्या अंगणात झोपलेल्या तीन महिलांच्या गळ्यातील सव्वा लाखांचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची घटना खानापूर येथे घडली. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. श्रीरामपूर तालुक्यातील खानापूर येथील शशिकांत आदिक हे एकत्र कुटूंबात राहतात. दोन दिवसांपूर्वीच जेवण झाल्यावर रात्री १० वाजता सर्वजण अंगणात झोपले होते.पहाटेच्या सुमारास शशिकांत आदिक यांची भावजई सुवर्णा आदिक ह्या झोपेतून उठल्यानंतर त्यांना घरातील महिलांच्या गळ्यातील सोन्याच्या पोती दिसल्या नाही. तेव्हा, त्यांनी सर्वांना उठवले.शशिकांत यांच्या पत्नी, भावजई, आई यांच्या गळ्यातील प्रत्येकी अर्ध्या तोळ्याच्या ३ पोती आणि एक ५० हजार रुपये किंमतीचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने चोरून नेले.याप्रकरणी शशिकांत आदिक यांच्या फिर्यादीवरून पोलिसांत अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला.


निशाणी नंबर : ०८ **जाहीर नोटीस** अ‍ॅड. आर. एम. मुंगसे नेवासा कोर्ट

नेमलेली तारीख : २९/०६/२०२६

नेवासा येथील मे. जिल्हा न्यायाधीश-१ साहेब यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज नं. २८/२०२६

**अर्जदार** :१. शकुंतला गोरक्षनाथ तिडके वय ३७ वर्ष, धंदा काही नाही,
२. ऋतुजा गोरक्षनाथ तिडके वय १४ वर्ष, धंदा - शिक्षण
३. महेंद्र गोरक्षनाथ तिडके-वय १३ वर्ष, धंदा शिक्षण
अर्जदार नं. २ व ३ यांचे अज्ञान पालन करीता अर्जदार नं. १ जनक आई सर्व रा. देडगांव, ता. नेवासा, जि. अहमदनगर

**सामनेवाले**-मा. जिल्हाधिकारी साहेब, अहमदनगर

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अज्ञानाचे नावावरील मौजे देडगांव, ता. नेवासा, जि. अहमदनगर येथील ग्रा.प. मिळकत नं. १४४/२ मधील अज्ञानाचे नावावरील क्षेत्र १५X१८=२७० चौ.फुट (२५.०८ चौ. मिटर) यासी सिटीसर्व्हे नंबर ६१५ चे क्षेत्र ४१.८४ चौ. मिटर हे अज्ञानाचे पालनपोषण, शिक्षणासाठी व त्याचे हिताकरीता विक्री करण्याची परवानगी मिळणेकामी दिवाणी चौकशी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरील वादासंबंधी कुणाचेही काही म्हणणे असेल किंवा कुणाची काही हरकत असेल तर या सायटेशन नोटीस प्रसिध्द तारखेपासुन एक महिन्याचे आत अथवा दि. २९/०६/२०२६ रोजी या न्यायालयात स्वतः अगर वकीलांमार्फत सर्व कागदपत्रानिशी उपस्थित राहुन आपले लेखी म्हणणे सादर करावे. तसेच उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून योग्य तो हुकूम केला जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ११/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्यानिशी सायटेशन नोटीस दिली असे.

तयार करणार

**वरिष्ठ लिपीक**
**जिल्हा न्यायालय, नेवासा**

शिक्का

**हुकूमावरुन**
**अधीक्षक**
**जिल्हा न्यायालय, नेवासा**

# पान १ वरुन

## सौर ऊर्जा प्रकल्पामुळे दिवसा बारा तास वीज मिळणार : ना. विखे

म्हणाले, सध्या पाणीस्थिती अत्यंत गंभीर असून प्रशासनाच्या वतीने पाण्याचे नियोजनबद्ध वितरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. तळेगावपर्यंत पाणी आणण्यासाठी भोजापूर चारीच्या विस्तारीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून त्यासाठी ४२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामुळे तळेगाव परिसरातील शेतीला मोठा दिलासा मिळणार आहे.

सिन्नर तालुक्यासाठी तयार करण्यात आलेल्या १२ हजार कोटी रुपयांच्या दमणगंगा-वैतरणा-गोदावरी प्रकल्पात आता संगमनेर तालुक्यातील भागाचा ही समावेश करण्यात आला आहे. या प्रकल्पाचे पाणी तळेगाव परिसरातील खालच्या पट्ट्यापर्यंत आणण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रस्तावास सकारात्मक प्रतिसाद दिल्यामुळे दुष्काळी भागाला मोठा दिलासा मिळणार आहे.जिल्ह्यात नव्या उद्योगांसाठी गुंतवणूकदार उत्सुक असून जमिनीची मागणी वाढत आहे. शिर्डी येथे लवकरच एका मोठ्या उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन होणार असून त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होणार आहे. तरुणांनी केवळ पदवीवर अवलंबून न राहता तांत्रिक कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आमदार अमोल खताळ म्हणाले, नवीन सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे भागवतवाडी, वामनवाडी, जुने गाव आणि काकडवाडी परिसरातील सुमारे ९०० शेतकऱ्यांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत पूर्ण दाबाने त्रि-फेज वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे दिवसा वीजपुरवठ्याची शेतकऱ्यांची दीर्घकालीन मागणी पूर्ण झाली आहे. तसेच वन्य प्राण्यांच्या भीतीमुळे रात्री शेतीला पाणी देण्याचा त्रासही कमी होणार आहे.

## तारळी-निवकणेनंतर आता कोयना धरणावरही अदानीचा डोळा

फोडून बोगद्यांचे काम सुरू करण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी १५०.७४ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात आले असून, स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचे आरोपही होत आहेत. दरम्यान, कोयना-निवकणे हायड्रो प्रोजेक्ट या नावाने अदानी ग्रीन एनर्जीने निवकणे धरणावर २७०० मेगावॉट क्षमतेचा प्रकल्प प्रस्तावित केला आहे. या प्रकल्पासाठी निवकणे, म्हारवंड, मराठवाडी, भारसाखळे आणि जवरातवाडी परिसरातील ३६१.८२ हेक्टर क्षेत्र संपादित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सुमारे ८,६१५ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पाच्या कामास २०३० पासून टप्प्याटप्प्याने सुरुवात होणार असल्याचे सांगितले जात आहे.

मात्र, १९९९ पासून रखडलेल्या निवकणे धरण प्रकल्पाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. बाधित शेतकऱ्यांना पर्यायी जमीन न मिळाल्याने अदानीच्या प्रस्तावित प्रकल्पाला स्थानिक शेतकऱ्यांचा तीव्र विरोध आहे.

विशेष म्हणजे, निवकणे प्रकल्पाला कोयना-निवकणे असे नाव देण्यात आल्याने भविष्यात कोयना धरणाचाही यात समावेश होणार का, याबाबत चर्चा सुरू आहे. सूत्रांच्या माहितीनुसार कोयना धरण परिसरात सध्या अंतर्गत सर्वेक्षण सुरू असून भविष्यात येथे किमान १० हजार मेगावॉट क्षमतेचा प्रकल्प उभारण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

जर हे सर्व प्रकल्प प्रत्यक्षात आले, तर पाटण तालुका देशातील सर्वात मोठ्या ऊर्जा केंद्रांपैकी एक ठरू शकतो. मात्र यासाठी स्थानिकांचे प्रश्न, पर्यावरणीय परिणाम आणि धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा मुद्दा ऐरणीवर येणार हे निश्चित मानले जात आहे.

## २६ तारखेला यांनी बैल कापला तर...आ. संग्राम जगताप यांचा पोलिसांना इशारा

आमदार महेश लांडगे आणि आमदार संग्राम जगताप देखील उपस्थिती होते. दरम्यान जन आक्रोश मोर्चानंतर आयोजित सभेमध्ये बोलताना आमदार संग्राम जगताप यांनी प्रशासनाला गंभीर इशारा दिला. त्यांच्या या वक्तव्यानंतर आता वातावरण तापण्याची शक्यता आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, पोलीस प्रशासनाला आजच सांगतो. २६ तारखेला बैल कापला गेला तर २७ तारखेला इथे आम्ही येऊ. तुम्ही जरा खबरदारी घ्या. राजकीय पक्ष जरी काम करत नसले तरी आपल्याला हिंदू म्हणून काम करावं लागेल. या लोकांशी कुठलाही आर्थिक व्यवहार करायचा नाही, हा कायदा आपण करून टाका, हे आपल्याला ठरवावं लागणार आहे. आपलं संघटन कायम ठेवा, हिंदू समाज कधीही थांबणार नाही, असं यावेळी संग्राम जगताप यांनी म्हटलं आहे.

## शिर्डीत देशातील सर्वात मोठ्या संरक्षण कारखान्याचे संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

'मेक फॉर द वर्ल्ड' या संकल्पनांना बळ देणारा हा महत्त्वाचा प्रकल्प असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. शिर्डी औद्योगिक वसाहतीतील सुमारे दोनशे एकर क्षेत्रावर विविध संरक्षण प्रकल्प विकसित करण्यात येत आहेत. यामध्ये रॉकेट लाँचर, लांब पल्ल्याच्या रॉकेटचे सुटे भाग, स्वयंचलित ड्रोन व विविध इलेक्ट्रॉनिक यंत्रणांच्या चाचणी सुविधा विकसित केल्या जात आहेत. या प्रकल्पांसाठी सुमारे एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असून, त्यापैकी सहाशे कोटी रुपयांची गुंतवणूक पूर्ण झाली आहे. या माध्यमातून सुमारे दोन हजार नागरिकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार आहे. याच दिवशी प्रतिदिन पंधरा टन क्षमतेच्या बायो-सीएनजी प्रकल्पाचेही उद्घाटन करण्यात येणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथे राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेल्या सुमारे सहाशे एकर जागेवर भव्य दारूगोळा निर्मिती संकुल उभारण्यात येत आहे. या संकुलात टीएनटी, आरडीएक्स, एचएमएक्ससारखी विविध स्फोटके व प्रणोदक तयार करणारे कारखाने उभारले जात असून, त्यासाठी सुमारे दोन हजार कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक प्रस्तावित आहे. दरवर्षी वीस हजार टन टीएनटी उत्पादनाची क्षमता येथे निर्माण होणार असून, सरकारी व खासगी क्षेत्रातील ही देशातील सर्वांत मोठी क्षमता ठरणार आहे. टीएनटी व आरडीएक्स निर्मितीचे कारखाने पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित असून, त्यांचे उद्घाटन व सादरीकरण लवकरच होणार आहे.

शिर्डी येथे तयार होणाऱ्या तोफगोळ्यांमध्ये स्फोटके भरण्याचे महत्त्वाचे काम अहिल्यानगर येथील प्रस्तावित कारखान्यात केले जाणार आहे. सर्व प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर जिल्ह्यातील सुमारे चार ते पाच हजार तरुणांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार असल्याचे पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले. जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांनाही या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होणार आहेत. अहिल्यानगर जिल्ह्याला संरक्षण क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली असून, रणगाडा प्रशिक्षण केंद्र, के.के. रेंजेस व मेकॅनाईज्ड इन्फंट्री रेजिमेंटल सेंटरमुळे जिल्ह्याला आधीपासूनच संरक्षण क्षेत्रातील महत्त्व आहे. नव्या प्रकल्पांमुळे या ओळखीला अधिक बळ मिळणार असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. शिर्डी हे धार्मिक स्थळ असल्याने प्रदूषणाचा धोका टाळण्यासाठी हा प्रकल्प विशेष रासायनिक क्षेत्रात उभारण्यात आला आहे. स्थानिक युवकांना रोजगारासाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्य विकासावर विशेष भर देण्यात येत आहे. रतन टाटा ट्रस्टच्या सहकार्याने औद्योगिक वसाहतीमध्ये विशेष इनोव्हेशन सेंटर सुरू करण्यात येत असून, त्यासाठी दोनशे कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. एमआयडीसीकडूनही पन्नास कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. राहाता येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे स्थलांतर एमआयडीसी परिसरात करण्यात आले असून, भविष्यातील विस्तारासाठी सुपे परिसरात संरक्षण विभागाच्या जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया प्राथमिक स्तरावर सुरू असल्याची माहितीही देण्यात आली. या उद्घाटनाच्या निमित्ताने २३ व २४ मे रोजी विशेष संरक्षण प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील प्रमुख संरक्षण उत्पादन कंपन्या व शंभरहून अधिक सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. जिल्हाभरातून नागरिक या प्रदर्शनाला भेट देतील व तरुणांसाठी संरक्षण क्षेत्रातील संधी जाणून घेण्याची ही मोठी संधी ठरणार असल्याचे पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

# नेवासा येथे बुधवारी राज्य पदाधिकारी मेळाव्याचे आयोजन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** गाव कामगार पोलीस पाटील संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनेचा प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने राज्य पदाधिकारी मेळाव्याचे आयोजन बुधवार दिनांक २० मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नेवासा-नेवासाफाटा रस्त्यावर असलेल्या लक्ष्मी मंगल कार्यालयात करण्यात आले आहे.

गाव पोलीस पाटील संघटनेचे संस्थापक राज्याध्यक्ष शिवाजीराव कोलते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यास आहिल्यानगर जिल्हयाचे पोलीस अधिक्षक श्री.मुम्मका सुदर्शन,नेवासा तालुक्याचे आमदार श्री.विठ्ठलराव लंघे पाटील,माजी मंत्री शंकरराव गडाख पाटील,माजी आमदार पांडुरंग अभंग, प्रांताधिकारी सुधीर पाटील,तहसीलदार डॉ.संजय बिरादार पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांची प्रमुख अतिथी उपस्थिती राहणार आहे.

महाराष्ट्र राज्यातील सर्व पोलीस पाटलांच्या सहकार्याने, विश्वासाने आणि अथक परिश्रमाने गाव कामगार पोलीस पाटील संघटना, महाराष्ट्र राज्य यशस्वीपणे एक वर्ष पूर्ण करीत आहे.या आनंददायी क्षणाचे औचित्य साधून सदरचा राज्य मेळावा घेण्यात येतं आहे. महाराष्ट्र राज्यातील सर्व राज्य पदाधिकारी, संस्थापक सदस्य, जिल्हाध्यक्ष, जिल्हा कार्यकारणी सदस्य, तालुकाध्यक्ष, तालुका उपाध्यक्ष, तालुका सचिव तसेच सर्व पोलीस पाटील बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन आहिल्यानगर गाव कामगार पोलीस पाटील संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

# छत्रपती संभाजीराजे यांच्या जयंतीनिमित्त उंदिरगावात जिजाऊंच्या लेकीचा सन्मान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**उंदीरगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील उंदीरगाव येथे नियोजित शिवस्मारक परिसरात छत्रपती संभाजीराजे जयंती निमित्ताने सर्व धर्मीय जिजाऊंच्या लेकींचा सन्मान करण्यात आला.यावेळी,या परिसराला शक्तिस्थळ म्हणून जाहीर करण्यात आले.डिजिटल शक्तीस्थळ बोर्डाचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. यावेळी गावात सामजिक काम करणाऱ्या आशा सेविका, अंगणवाडी सेविकासह नारायणगिरी महाराज महिला भक्त मंडळ इतर या जिजाऊंच्या लेकींचा सत्कार करण्यात आला.शक्तीस्थळ परिसर सुशोभित करण्यासाठी यावेळी ज्येष्ठ नागरिक,सत्कारमूर्ती



महिला व तरुण मुले यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

लहान मुलांनी वृक्ष संवर्धनाकरिता वृक्षांना पाणी देऊन जबाबदारी स्वीकारली. या कार्यक्रमाला गावातील आस्तिक औताडे,अनिल ताके, अमृता राऊत,युवराज गायके,रंगनाथ गायके मेजर,समर्थ ताके,गोपाल भोसले,शंकर थावरे,या मान्यवरांनी सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.यावेळी अशोक कारखान्याचे माजी चेअरमन सुरेश पाटील गलांडे, बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाऊलबुद्धे, जितेंद्र गोलवड,पवन पाऊलबुद्धे,प्रकाश ताके,बाळासाहेब घोडे,महावितरणचे विनोद ताके,दिलीप मोरे,रावसाहेब थोरात,मनोज बोडखे नचिकेत ताके,मंगेश बर्फेसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिरदाळेच्या तळ्याच्या पाणी पातळीत लक्षणीय घट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** शिरदाळे (ता.आंबेगाव) येथील गाव तळ्याच्या पाणी पातळीत लक्षणीय घट झाली आहे. सुरू असलेला कडक उन्हाळा,वातावरणातील बदल यामुळे यावर्षी पाणी पातळी चांगलीच घटली आहे. गेल्यावर्षी मे महिन्याच्या मध्यावर पावसाने सुरवात केली होती.यंदा मात्र पाऊस लांबणीवर गेल्याचे पाहायला मिळत आहे.शेतकरी देखील पावसाची आतुरतेने वाट पाहत असून सुरवातीचा वळवाचा मान्सून पूर्व पाऊस झाल्यास शेतीच्या कामांना चांगलं वेग येईल परंतु अजून तरी अशी शक्यता दिसत नाही. १९७२ च्या दुष्काळात रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून तळ्याचे खोलीकरण करण्यात आहे.त्यानंतर २००७-०८ साली भीमाशंकर सहकारी साखर कारखाना यांच्या माध्यमातून पुन्हा खोलीकरण करण्यात आले.त्यामुळे पाणी साठा वाढला असून तेव्हापासून आजपर्यंत हे तळे कधीच आटले नाही.गावातील शेतकऱ्यांची जनावरे पाणी पिण्यासाठी याचा वापर करतात.तर महिला मंडळी कपडे धुण्यासाठी देखील याचा वापर करतात. तळ्यात सात ते आठ फुटांपर्यंत मासे या तळ्यात अनेक प्रजातीचे मासे आहेत

# ठाकरे गटाच्या तालुका प्रमुख पदी विजय गव्हाणे यांची नियुक्ती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** कट्टर शिव सैनीक विजय गव्हाणे यांची काल शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे राहुरी तालुक्याचे प्रभारी तालुका प्रमुख नियुक्ती करण्यात आली. या निवडीचे पत्र जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी यांनी विजय गव्हाणे यांना नुकतेच दिले.विजय गव्हाणे यांनी १९९३ पासुन शिव सैनीक म्हणुन काम केले असुन त्यांनी शहराध्यक्ष राहुरी कारखाना तसेच देवळाली प्रवरा ३२ गावे तालुका प्रमुख म्हणुन काम पाहिले आहे. अंत्यत निष्ठावान, धाडसी तसेच लोकांचे मदतीला धावुन जाणारे व्यक्तीमत्व म्हणुन विजय गव्हाणे यांचा नावलौकिक आहे.त्यांची पक्षावर असलेली अतूट निष्ठा व काम करण्याची पद्धत लक्षात घेवुन त्यांची निवड केल्याचे जिल्हा प्रमुख राजेंद्र दळवी यांनी नमुद करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विजय गव्हाणे यांचे निवडीने निष्ठावंताला न्याय मिळाल्याच्या भावना शिवसैनीक व्यक्त करत असुन संघटनेत नवचैतन्य निर्माण झाले आहे. या निवडी प्रसंगी शिवसेनेचे दत्ता कडु पाटील, चौथे, बाळासाहेब शिंदे, सचिन लाटे, विजय कुमावत तसेच सचिन मोरे हे उपस्थित होते. पक्ष बांधणी व पक्ष संघटन मजबुत करुन सर्व सामान्यांच्या मदतीसाठी अहोरात्र काम करण्याचे विजय गव्हाणे यांनी यावेळी बोलताना सांगितले.



**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME GAGARE KETAN DATTATRAYA (EDUCATIONAL DOCUMENTS) ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS KETAN DATTATRAY GAGARE (AADHAR NO. 3087 5829 7606) FROM VIDE AFFIDAVITBEFORE NOTARY PUBLIC RAHURI PLACE: RAHURI DATE : 18/05/2026

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME ATTAR KAISAR BANO HAROON ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS KAUSAR JUNED ATAR(AADHAR NO. 6007 5973 9795)FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC RAHURI PLACE: RAHURI DATE : 18/05/2026

# लेकीच्या वाढदिवसानिमित्त शरणपूर वृद्धाश्रमातील वृद्धांना धोंड्याचे मिष्टान्न

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील देवगडफाटा येथील संतसेवक राजेंद्र गीते यांची पुणे येथील कन्या दीपाली गीते यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने स्त्री जन्माचे स्वागत उपक्रम म्हणून पित्याने रांजणगावदेवी फत्तेपुर रस्त्यावर असलेल्या शरणपूर वृद्धाश्रमातील वृद्धांना धोंड्या निमित्त मिष्टान्न भोजन देऊन आपल्या मुलीचा वाढदिवस साजरा केला. आजच्या काळात असे उपक्रम पुण्य प्राप्तीचे साधन असून याप्रसंगी वृद्धांनी दिपालीच्या दीर्घायुष्य जीवनासाठी प्रार्थना केली.

शरणपूर येथे झालेल्या धोंडा जेवण कार्यक्रमात मातापिता समान असलेल्या




३५ वृद्धांना यावेळी धोंडयासह मिष्टान्न भोजन देण्यात आले.यावेळी राजेंद्र गीते,युवा कार्यकर्ते स्वप्नील गीते, वृद्धाश्रमाचे संपर्क प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण, वृद्धाश्रम चालक रावसाहेब मगर, व्यवस्थापक संतोष मगर, पत्रकार बाळासाहेब पंडित, भोजन कक्ष प्रमुख ज्योतीताई मगर उपस्थित होते.

वृध्दाश्रम चालक रावसाहेब मगर म्हणाले की सद्याचे वाढदिवस तोफांची सलामी देत फटाक्यांची आतषबाजीने साजरे होतात मात्र राजेंद्र गीते व त्यांच्या परिवाराने वायफट खर्च बाजूला सारून कुटुंबातील भूषण असलेल्या दीपालीताई गीते यांचा जन्मदिन स्त्री जन्माचे स्वागत म्हणून अन्नदानाच्या माध्यमातून साजरा केला याबद्दल कौतुक केले.

आपल्या कार्य कर्तृत्वाने दीपालीताई गीते यांनी पुणे मुळशी येथे डेव्हलपर्स कंपनीच्या माध्यमातून उंच भरारी घेतली ही बाब पित्यासाठी निश्चितच कौतुकास्पद असल्याचे पत्रकार सुधीर चव्हाण यांनी या उपक्रम प्रसंगी बोलतांना सांगितले. शासन अनुदान नसलेल्या व लोक सहभागातून मगर यांनी चालवलेल्या या वृद्धाश्रमाला दात्यांनी सढळ हाताने मदत करावी असे आवाहन यावेळी बोलतांना केले. व्यवस्थापक संतोष मगर यांनी आभार मानले.

# आठवड्याच्या पहिल्याच दिवशी साबाचे अधिकारी-कर्मचारी गैरहजर

## आ. बंब यांच्या सूचनांकडे दुर्लक्ष



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयात आठवड्याच्या पहिल्याच दिवशी अधिकारी व कर्मचारी वेळेवर उपस्थित नसल्याचे समोर आले आहे. काही दिवसांपूर्वी आमदार प्रशांत बंब यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहून जनतेची कामे वेळेत करावीत, अशा सूचना दिल्या होत्या. मात्र संबंधित विभागातील अधिकारीच या सूचनांकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

सामाजिक कार्यकर्ते माजी बांधकाम सभापती संतोष जाधव हे शंकरपूर-शिरेसायगाव-वजनापूर-लिंबेजळगाव रस्त्याच्या कामासंदर्भात सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयात गेले असता त्यांनी कार्यालयाचा पंचनामा केला. हा पंचनामा गंगापूरचे तलाठी गणेश लोणे यांनी केला.

यावेळी कार्यालयात एकूण बारा कर्मचारी कार्यरत असताना केवळ एक लिपिक उपस्थित असल्याचे आढळून आले. अधिकारी व इतर कर्मचारी गैरहजर असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. उपअभियंता दिलीप कोलते हे छत्रपती संभाजीनगर येथून ये-जा करत असल्याचे सांगितले जात आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी दिलीप कोलते हे देखील छत्रपती संभाजीनगर येथून अप-डाऊन करत असल्याची माहिती समोर आली आहे.

आठवड्याच्या पहिल्याच दिवशी अधिकारी व कर्मचारी वेळेवर उपस्थित नसल्यामुळे शासकीय कामकाजावर परिणाम होत असून जनतेची कामे रखडत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. आमदार प्रशांत बंब यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याचे आवाहन करूनही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नसल्याचे या पंचनाम्यातून स्पष्ट झाले आहे.

शासन अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहून जनतेची कामे वेळेत करणे ही त्यांची जबाबदारी आहे. वारंवार सूचना देऊनही अधिकारी वेळेवर उपस्थित राहत नसतील तर ही गंभीर बाब आहे. जनतेची कामे रखडणार नाहीत यासाठी संबंधित विभागाने तत्काळ सुधारणा करावी, अन्यथा वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करून कारवाईची मागणी करण्यात येईल, आमदार प्रशांत बंब यांनी दिली.

सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयात नागरिकांची विविध कामांसाठी सतत ये-जा असते. मात्र आठवड्याच्या पहिल्याच दिवशी अधिकारी व कर्मचारी गैरहजर आढळणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. आमदार प्रशांत बंब यांनी मुख्यालयी राहण्याच्या स्पष्ट सूचना दिल्यानंतरही अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची कामे रखडत असून लोकांना विनाकारण हेलपाटे मारावे लागत आहेत. संबंधित विभागाने तात्काळ शिस्त लावून अधिकारी-कर्मचारी वेळेवर उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी, अशी प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते संतोष जाधव यांनी दिली.

# अवैध मुरूम वाहतुकीच्या गाड्यांनी नव्याने बांधलेल्या पुलाचे नुकसान

## प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये संताप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**म्हैसगाव :** राहुरी तालुक्यातील म्हैसगाव परिसरात सुरू असलेल्या अवैध मुरूम उत्खनन आणि त्यातून होणाऱ्या अवजड वाहतुकीमुळे नव्याने बांधण्यात आलेल्या पुलाचे मोठे नुकसान झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. माजी आमदार प्राजक्ता दादा तनपुरे यांच्या विशेष प्रयत्नातून केदारेश्वर मंदिर परिसरात उभारण्यात आलेल्या नव्या पुलाला मुरूम वाहतूक करणाऱ्या हायवा गाड्यांच्या सततच्या धक्क्यांमुळे गंभीर तडे गेले असून पुलाची एक बाजू पूर्णपणे उध्वस्त झाली आहे. त्यामुळे या पुलाच्या सुरक्षिततेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही महिन्यांपासून परिसरात मोठ्या प्रमाणात अवैद्य मुरूम उत्खनन सुरू असून दिवस-रात्र अवजड हायवा गाड्यांची वाहतूक सुरू आहे. या गाड्या वेगाने आणि



क्षमतेपेक्षा जास्त मुरूम भरून जात असल्याने पुलावर मोठा ताण पडत आहे. अनेक वेळा चालकांचे नियंत्रण सुटल्याने पुलाच्या कठड्यांना धक्के बसले. अखेर सततच्या धक्क्यांमुळे पुलाची एक बाजू कोसळल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे हा पूल ग्रामस्थांच्या दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. केदारेश्वर मंदिर परिसर, शेतकरी आणि ग्रामस्थांसाठी हा मार्ग मुख्य संपर्काचा रस्ता आहे. मात्र आता पुलाचा काही भाग कोसळल्याने नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात एखादी मोठी दुर्घटना घडण्याची भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. ग्रामस्थांनी प्रशासनावर गंभीर आरोप करताना सांगितले की, मुरूम उत्खनन आणि वाहतुकीबाबत वारंवार तक्रारी करूनही महसूल विभाग आणि संबंधित यंत्रणा याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत. अवैध उत्खननामुळे केवळ पुलाच नव्हे तर संपूर्ण रस्त्यांचीही दुरवस्था होत असून अनेक ठिकाणी रस्ते खचण्यास सुरुवात झाली आहे. धुळीमुळे नागरिकांचे आरोग्यही धोक्यात आले आहे. स्थानिक नागरिकांनी संबंधित मुरूम वाहतूक तात्काळ बंद करण्याची मागणी केली असून पुलाची तातडीने दुरुस्ती करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. अन्यथा ग्रामस्थांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, नव्याने उभारण्यात आलेल्या सार्वजनिक मालमत्तेचे अशा प्रकारे नुकसान होत असताना प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेणार, याकडे आता संपूर्ण राहुरी तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# निधन वार्ता


## जनार्धन फड



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आधि :** प्रतापपुर येथील प्रगतीशील शेतकरी व माजी सैनिक जनार्धन भिमाजी फड यांचे नुकतेच अल्पशा आजाराने दुखद निधन झाले. त्यांनी भारतीय सैन्यदलात उत्तम कामगिरी बजावली होती त्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला होता. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, नातवंडे, सुना, जावई, एक भाऊ, पुतणे असा मोठा परिवार आहे. मुंबई पोलीस दलात कार्यरत असणारे राजेंद्र फड व प्रतापपूर येथील व्यावसायिक केशव फड यांचे ते पिताश्री होते.

## नीता सातदिवे



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर:** येथील नेवासा रोडवरील रामकृष्णनगर येथे वास्तव्यास असलेल्या नीता भास्कर सातदिवे (वय ६६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, २ मुले, १ मुलगी, पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्या ग्रामीण रुग्णालयातील सेवानिवृत्त डॉ. भास्कर सोनाजी सातदिवे यांच्या पत्नी व छत्रपती शिवाजी रोड हरिकमल प्लाझा मधील दंतरोग तज्ञ डॉ. सुशांत सातदिवे, प्रशांत सातदिवे व सविता आदेश गायकवाड यांच्या त्या मातोश्री होत.

# शहरात वीज पुरवठ्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादीचे आंदोलन

## अधिकाऱ्यांनी स्वतः बरोबर जनतेची काळजी घ्यावी : संपत बारस्कर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरामध्ये कोणतीही पूर्वसूचना न देता विद्युत विभागाच्यावतीने वारंवार वीज पुरवठा खंडित केला जात असल्याने भर उन्हाळ्यात नागरिक त्रस्त झाले आहेत. दिवसा आणि रात्री सतत होणाऱ्या वीजखंडितीमुळे नागरिकांना उष्माघाताचा त्रास सहन करावा लागत असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांचे मोठे हाल होत आहेत. वारंवार लाईट जात असल्यामुळे व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान होत असून शहराचा पाणीपुरवठाही विस्कळीत होत आहे. या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने महावितरण कार्यालयावर घडक मोर्चा काढून आंदोलन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी अधीक्षक अभियंता रमेश कुमार पवार यांना निवेदन दिले. येत्या आठ दिवसांच्या आत वीज पुरवठ्याबाबत ठोस उपाययोजना न केल्यास कोणत्याही क्षणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अधिकाऱ्यांना काळे फासण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

या आंदोलनात नगरसेवक कुमारसिंह वाकळे, सुरेश बनसोडे, प्रकाश भागानगरे, प्रा. माणिक विधाते, संभाजी पवार,



जॉय लोखंडे, साधना बोरुडे, रोहिणी अंकुश, सागर गुंजाळ, सुरज कोतकर, सुरज शिंदे, दीपक खेडकर, नितीन घोडके, रणजीत सत्रे, मनोज नन्नवरे, दीपक गांगर्डे, मारुती पवार, ऋषिकेश ताठे, शैलेश मते यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संपत बारस्कर म्हणाले की, अहिल्यानगर शहरामध्ये दिवस-रात्र कोणतीही पूर्वसूचना न देता वीज पुरवठा खंडित केला जात आहे. भर उन्हाळ्यात नागरिक त्रस्त झाले असून अधिकारी मात्र एसी कार्यालयात बसून स्वतःची काळजी घेत आहेत. जनतेच्या हालअपेष्टांकडे दुर्लक्ष केले जात आहे. लाईट गेल्यामुळे व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत असून पाणीपुरवठाही विस्कळीत होत आहे. नागरिकांनी वीजबिल एक दिवस जरी भरले नाही तर महावितरण विभाग तत्काळ कनेक्शन कट करतो. मात्र वारंवार होणारी ट्रिप लाईट सुरू करण्यासाठी विभागाकडे वेळ नसतो. त्यामुळे हा सर्व प्रकार जाणीवपूर्वक होत असल्याचे दिसून येत आहे.

पावसाळ्यापूर्वी महावितरण विभागाने आवश्यक उपाययोजना कराव्यात. नागरिकांच्या तक्रारी तत्काळ सोडवण्यासाठी स्वतंत्र टोल फ्री नंबर जाहीर करावा. नागरिकांना योग्य सेवा देणे ही विभागाची जबाबदारी आहे. मात्र त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे. येत्या आठ दिवसांत परिस्थितीत सुधारणा न झाल्यास राष्ट्रवादीच्यावतीने कोणतीही पूर्वसूचना न देता तीव्र आंदोलन करण्यात येऊन संबंधित अधिकाऱ्यांना काळे फासण्यात येईल. असा इशारा यावेळी देण्यात आला.

# नीट पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करा

## बहुजन समाज पार्टीची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** नीट परीक्षेमधील महाघोटाळा, पेपरफुटी आणि भ्रष्टाचाराची निष्पक्ष चौकशी करून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याची मागणी बहुजन समाज पार्टीच्या वतीने करण्यात आली. या प्रकरणातील मुख्य सूत्रधारांवर कठोर कारवाई करून भविष्यात अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली. या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांना देण्यात आले असून, त्यांच्या मार्फत राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले आहे.

नीट परीक्षेमधील कथित महाघोटाळा, पेपरफुटी आणि भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ बहुजन समाज पार्टीच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी जिल्हाध्यक्ष सुनिल ओहळ, जिल्हा उपाध्यक्ष शहानवाज शेख, जिल्हा महासचिव राजू शिंदे, निलेश घोडके, फिरोज शेख, बाळकृष्ण काकडे, राम ससाणे, शिवम साळवे, राहुल हरिभगत, उस्मान शेख, राहुल पटेकर, सुरेश गायकवाड, संतोष मोरे, नवनाथ साळवे, छबु मोरे, मच्छिंद्र बर्डे, दत्ता साळवे, अनिल लष्करे, गणेश बागल, श्याम आवटी आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, देशातील लाखो होतकरू आणि मेहनती विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणारा हा 'नीट पेपरफुटी घोटाळा' अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार झाल्याचे समोर आले असून, या घटनेमुळे देशातील शिक्षण आणि परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे.

बहुजन समाज पार्टीने विद्यार्थ्यांच्या भविष्याचा आणि मेहनतीचा प्रश्न उपस्थित करत म्हटले आहे की, देशातील गरीब, दलित, मागासवर्गीय आणि मध्यमवर्गीय कुटुंबांतील विद्यार्थी कर्ज काढून, रात्रंदिवस अभ्यास करून डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहतात. मात्र, विद्यमान सरकार आणि छढ- च्या निष्काळजीपणामुळे तब्बल २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात लटकले आहे. विद्यार्थ्यांच्या परिश्रमांचा आणि पालकांच्या त्यागाचा हा मोठा अपमान असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या घोटाळ्याचे महाराष्ट्रातील नाशिकसह इतर भागांशी संबंध असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे. पेपर माफिया आणि सफेदपोश गुन्हेगारांचे मोठे रॅकेट सक्रिय असल्याचे समोर येत असून, ही राज्य सरकारच्या गुप्तचर आणि सुरक्षा यंत्रणेची मोठी अपयशाची बाब असल्याचे बहुजन समाज पार्टीने म्हटले आहे. परीक्षा रद्द करण्यात आल्याने मोठ्या प्रमाणावर घोटाळा झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

# आनंदवन वॉटर पार्कमध्ये ५ वर्षांच्या चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील निंबोडी येथे असलेल्या आंनदवन वॉटर पार्क मध्ये कुंटुबासह फिरण्यासाठी गेलेल्या एका ५ वर्षीय चिमुरड्याचा पाण्यात बुडून दुर्देवी मृत्यू झाला. या दुर्देवी घटनेमूळे शहरासह जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. राजवीर भारत पवार (वय ५ वर्ष, राहणार अलगुडेवाडी, तालुका फलटण, जिल्हा सातारा) असे मृत पावलेल्या चिमुरड्याचे नाव आहे.

सध्या संपूर्ण जिल्ह्यामध्ये उन्हाचा पारा मोठ्या प्रमाणावर वाढत चालला आहे. शाळा आणि महाविद्यालयांना उन्हाळ्याची सुट्टी सुरू असल्याने अनेक नागरिक आपल्या कुटुंबासह विविध पर्यटन स्थळांवर फिरायला जात आहेत. उन्हाच्या त्रासापासून सुटका मिळवण्यासाठी अनेक जण पाण्याच्या ठिकाणी जाण्याला मोठी पसंती देत असल्याचे चित्र आहे. मात्र, याच दरम्यान अहिल्यानगर जिल्ह्यातून एक अत्यंत धक्कादायक आणि मनाला चटका लावणारी दुर्दैवी घटना समोर आली आहे. पर्यटन स्थळावर फिरायला आलेल्या एका कुटुंबातील पाच वर्षांच्या चिमुकल्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार राजवीर हा आपल्या कुटुंबासोबत निंबोडी येथील आनंदवन वॉटर पार्क या ठिकाणी उन्हाळ्याच्या सुट्टीचा आनंद घेण्यासाठी आला होता. वॉटर पार्कच्या परिसरात खेळत असताना अचानक त्याचा पाण्यात पडून बुडून मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून या प्रकरणी पुढील तपास सुरू केला आहे. एका हसत्याखेळत्या चिमुकल्याचा असा अचानक अंत झाल्याने पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये पाण्याच्या ठिकाणी जाताना नागरिकांनी आपल्या लहान मुलांची विशेष काळजी घेणे गरजेचे असल्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# 'रुबाब' वस्त्रदालनाचे संचालक सनी जाधव सह कुटूंबियांना मारहाण

## परस्परविरोधी दोन्ही गटांवर गुन्हे दाखल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नगर-कल्याण रोड भागात दोन तरुणांनी नगरच्या रुबाब वस्त्र दालनाचे संचालक सनी जाधव यांच्याशी वाद घालत थेट पिस्तूल रोखून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. यावेळी त्यांच्या कुटुंबियांनाही मारहाण करण्यात आली. दरम्यान जुन्या वादातून सनी जाधव व कुटुंबियांनी लाथा बुक्याने व लाकडी दांडक्याने मारहान केली. या बाबत कोतवाली पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी फिर्यादी दाखल झाले आहेत. याबाबत सनी राजेंद्र जाधव (वय २८, रा. जाधव पेट्रोलपंपामागे, कल्याण रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, १७ मे रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास हे त्यांच्या मित्रासोबत घरासमोरील औषध दुकानात आले होते. त्यावेळी बोल्हेगाव येथील जुने परिचित रवी साळुंके आणि निखील चव्हाण हे दोघे तिथे आले. त्यांनी सनी यांच्याशी जुन्या कारणावरून हुज्जत घालत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली, या वादातून निखील याने सनी यांचे हात पाठीमागून घट्ट धरून ठेवले. याच वेळी रवी साळुंके याने कमरेला लावलेले पिस्तूल काढून ते लोड केले व जीवे मारण्याची धमकी दिली. सनी यांनी आरडाओरड केली. आवाज ऐकून सनी यांच्या कुटुंबातील सदस्य मदतीसाठी धावून आले. सर्वांनी मिळून मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता, संशयित आरोपींनी सनी यांच्या वडिलांना आणि कुटुंबातील इतर सदस्यांना लाथाबुक्क्यांनी व हाताने बेदम मारहाण केली. यावेळी सनी यांच्या वडिलांनी धाडस दाखवून आरोपीच्या हातातील पिस्तूल हिसकावून घेतले, नागरिकांची गर्दी जमताच दोन्ही आरोपी तिथून पसार झाले. या प्रकरणी सनी जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी रवी साळुंके आणि निखील चव्हाण यांच्याविरुद्ध मारहाण आणि शस्त्र कायद्यान्वये गुन्हा नोंदवला आहे. तर रवी ज्ञानेश्वर साळुंके (वय ३०, रा. गणेश चौक, बोल्हेगाव फाटा, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, फिर्यादी हे आपल्या मित्रासह कल्याण रोड परिसरात गेले होते. तेथे पूर्ववैमनस्यातून आरोपी सनी जाधव, त्याचे वडील राजेंद्र जाधव, समीर जहागीरदार, प्रमोद दाणे आणि अक्षय जाधव (सर्व राहणार जाधवनगर, कल्याण रस्ता, अहिल्यानगर) यांनी फिर्यादी रवी साळुंके यांना अचानक गाठून अश्लील भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद वाढल्याने सर्व आरोपींनी एकत्र येत फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. याच दरम्यान आरोपी राजेंद्र जाधव याने हातातील लाकडी दांडक्याने साळुंके यांच्या डोक्यावर जोरदार प्रहार केला. यात साळुंके हा गंभीर झाला.तसेच निखिल चव्हाण हा मध्यस्थी करण्यासाठी आला. त्यालाही लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. जखमीना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# पैठण - पंढरपूर महामार्गाचे काम रखडले

## बोधेगावात रास्ता रोको

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** हातगाव - दोन तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या पैठण-पंढरपूर (७५२ई ) या राष्ट्रीय महामार्गाचे काम मंजूर होऊन त्यास जवळपास १० वर्षांचा कालावधी उलटला असून सुद्धा या मार्गाचे काम पूर्ण होत नसून मात्र काम सुरू करायचे आहे म्हणून हाती घेतलेले काम खोदून ठेवले असल्याने रखडलेल्या कामामुळे बोधेगावातील दलित वस्तीतून जाणाऱ्या नागरिकांचे जीवन अक्षरशः धुळीच्या विळख्यात सापडले असून, वाढत्या प्रदूषणाविरोधात अखेर शेवगाव - गेवराई या राज्य मार्गावर डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात हातगाव फाटा येथे ग्रामस्थांनी रीतसर निवेदन देऊन जवळपास दीड तास रास्तारोको आंदोलन छेडले.असून या वेळी राष्ट्रीय महामार्गाचे संभाजी नगर येथील सहाय्यक अभियंता योगेश नलावडे यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून दोन दिवसात काम सुरू करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिल्याने आंदोलन कर्त्यांनी आपले आंदोलन स्थगित केले आहे .अनेक वर्षांपासून महामार्गाचे काम अपूर्ण अवस्थेत पडून असल्याने रस्त्यावर उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः दलित वस्ती परिसरातील नागरिकांना श्वसनाचे त्रास, डोळ्यांची जळजळ आणि दैनंदिन जीवनात मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

महामार्गावरून दररोज शेकडो अवजड वाहनांची वाहतूक सुरू असताना रस्ता विना सिमेंट, खडी आणि डांबरीकरण तसाच सोडण्यात आल्याने परिसर कायम धुळीने व्यापलेला असतो. प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही दखल घेतली जात नसल्याने अखेर नागरिकांनी रस्त्यावर उतरून आंदोलनाचा मार्ग स्वीकारला.

या रास्तारोको आंदोलनाचे नेतृत्व माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश भोसले आणि वंचितचे जिल्हा उपाध्यक्ष युवा नेते सुनील खंडागळे यांनी केले. आंदोलनस्थळी वंचित बहुजन आघाडीचे नेते शाहूराव खंडागळे, सुनील खंडागळे आणि प्रथमेश सोनवणे यांनी प्रशासनावर जोरदार टीका करत नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा आरोप केला.

यावेळी लाडजळगावचे सरपंच अंबादास ढाकणे, राजेंद्र बनसोडे, बन्सी मिसाळ, बाबा पठाण, बन्नूभाई शेख, दादासाहेब भोंगळे, रामजी भोंगळे, बाळासाहेब भोंगळे, श्रीधर भोंगळे, संदीप भोसले, शहादेव बोरुडे, यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ व आंदोलक उपस्थित होते.

# आ. संग्राम जगताप यांच्यावर आक्षेपार्ह टिका : गुन्हा दाखल

## वादग्रस्त व्हिडिओप्रकरणी; संशयित महिला ताब्यात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सोशल मीडियाचा गैरवापर करून दोन समाजांत जातीय तेढ निर्माण करणारे वक्तव्य केल्याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंस्टाग्राम या सोशल मीडियावर आ. संग्राम जगताप आणि हिंदू धर्माबद्दल अत्यंत आक्षेपार्ह विधाने केल्याचा प्रकार समोर आला आहे.

कोतवाली पोलीस ठाण्याचे गोपनीय शाखेचे पोलीस कॉन्स्टेबल अनुप शेखर झाडबुके यांनी याप्रकरणी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. फिर्यादी झाडबुके हे १७ मे रोजी पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असताना, त्यांना इंस्टाग्रामवर एका आयडीवरून प्रसारित झालेला व्हिडिओ आढळला. या व्हिडिओमध्ये संशयित अफरोज हमीद शेख (रा. केडगाव, अहिल्यानगर) नावाच्या महिलेने आ. संग्राम जगताप यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन वैयक्तिक टीका केली. तसेच हिंदू धर्म आणि धार्मिक श्रद्धांबद्दल अपमानास्पद वक्तव्य केले. अहिल्यानगर शहराच्या नावाचा उल्लेख करून समाजात द्वेष पसरेल असे गंभीर विधानही या व्हिडिओत केले होते.

या वादग्रस्त व्हिडिओमुळे अहिल्यानगर शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये. म्हणून पोलिस प्रशासनाने या घटनेची गांभिर्याने दखल घेऊन संशयित महिलेविरूद्ध तात्काळ कारवाई केली. पोलीस कॉन्स्टेबल झाडबुके यांच्या तक्रारीवरून संशयित महिला अफरोज हमीद शेख हिच्याविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात कायदेशीर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सोशल मीडियावर धार्मिक भावना दुखावणारे आणि जातीय सलोखा बिघडवणारे संदेश किंवा व्हिडिओ प्रसारित करू नयेत, असे आवाहन पोलिस प्रशासनातर्फे नागरिकांना करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

क्रमांक ३२४/२०२५

## जाहीर नोटीस

**श्रीरामपूर येथील मे. उपविभाय अधिकारी साहेब, भाग श्रीरामपूर यांचे न्यालयातील आरटीएस अपील अर्ज**

**अर्जदार** – लक्ष्मण नामदेव नान्नोर

**विरुध्द** - २. जगन्नाथ तात्याबा चितळकर ---- प्रतिवादी

३. गोरक्षनाथ तात्याबा चितळकर---- प्रतिवादी

प्रति,

२. जगन्नाथ तात्याबा चितळकर ३. गोरक्षनाथ तात्याबा चितळकर रा. दोघेही मांडवे, ता. राहुरी जि. अहिल्यानगर ज्या अर्थी अर्जदार लक्ष्मण नामदेव नान्नोर रा. गंगापुर, ता. राहुरी जि. अहिल्यानगर यांनी आपले विरुध्द या न्यायालयात, तहसिलदार राहुरी यांनी आरटीएस केस क्र. १४४/२०२५ मध्ये दि.२०/०८/२०२५ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द आर टी एस अपील दाखल केलेले आहे. सदर अर्जात आपण प्रतिवादी म्हणुन सामील आहात, आपणास या न्यायालयामार्फत वारंवार नोटीस पाठवुन देखील नोटीस बजावणी होत नाही. त्यामुळे सदर प्रकरणाचे कामकाज लांबणीवर पडत आहे. त्याअर्थी आपणास या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आपण नोटीस प्रसिध्द झाल्या पासून नेमलेल्या तारखेपूर्वी म्हणजे दिनांक ०५/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० व. तहसिल कार्यालय राहुरी येथे आपण स्वत: अगर आपले वकीलामार्फत हजर होवुन आपले म्हणणे दयावे. आपण हजर न. राहील्यास प्रकरणाची एकतर्फे सुनावणी घेवून पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. सदरची जाहीर नोटीस आज दिनांक १८/०५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी दिली आहे.

शिका

सही

उपविभागीय अधिकारी

श्रीरामपूर भाग श्रीरामपूर

## द•ख•ल

### पाथर्डीच्या सुपुत्राचा सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे जाहीर सत्कार



**पाथर्डी :** पाथर्डी शहराचे सुपुत्र तथा घिसाडी समाजातील युवक अक्षय हरिभाऊ पवार यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या भारतीय वन सेवा या प्रतिष्ठित परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन करून पाथर्डी तालुक्याचे नाव उंचावले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शहरातील सुवर्णयुग तरुण मंडळ यांच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. अक्षय पवार यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, सामान्य कुटुंबातून पुढे येत जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या जोरावर हे यश मिळवले आहे. त्यांच्या यशामुळे संपूर्ण पाथर्डी तालुक्यासह सर्व स्तरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, अनेक युवकांसाठी ते प्रेरणास्थान ठरत आहेत.अक्षय पवार यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील युवकांनी मोठी स्वप्ने पाहून सातत्याने प्रयत्न केल्यास कोणतेही ध्येय अशक्य नसते, असा विश्वास तरुणांमध्ये निर्माण झाला आहे. असे गौरवोद्गार यावेळी रासने यांनी काढले. रविवारी सकाळी विर सावरकर मैदान परिसरातील हरिभाऊ पवार यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार समारंभात अक्षय पवार यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन व मानाचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या यशाचे कौतुक करत भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष वैभव शेवाळे, उत्सव समितीचे अध्यक्ष गोपालसिंग शेखावत, अभय गांधी, अनिल खाटेर, उमेश रासने, दिंगबर जोजारे, अक्रम आतार, योगेश घोडके, मोनिश उदबत्ते, मुकुंद सुराणा, भैय्या पानगे, इंजि. शाहरुख शेख यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या बास्केटबॉल सराव शिबिराला खेळाडूंचा प्रतिसाद



**अहिल्यानगर :** केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने एकदिवसीय बास्केटबॉल सराव शिबिराचे उत्साहात आयोजन करण्यात आले. या शिबिरासाठी भारतीय बास्केटबॉल संघाचे माजी कर्णधार व प्रशिक्षक तसेच भारतीय सैन्यात कार्यरत असलेले संभाजी कदम हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. सायंकाळी पार पडलेल्या या शिबिराला नगर शहरातील बास्केटबॉल खेळाडू व क्रीडाप्रेमींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संभाजी कदम यांनी खेळाडूंना बास्केटबॉलमधील मूलभूत कौशल्ये, शारीरिक तंदुरुस्ती, खेळातील शिस्त आणि संघभावना याविषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभव कथन करत उपस्थित खेळाडूंना प्रेरणा दिली. या कार्यक्रमास ऊर्जा गुरुकुलच्या संचालिका सौ. कल्याणी फिरोदिया, संभाजी कदम अकॅडमीचे संस्थापक श्री. शरद नागणे, कोच गणेश नागणे व कोच धनंजय नखले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे नियोजन केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर, खजिनदार सौ. रोहिणी कोतकर, प्रशिक्षक छबुराव कोतकर आणि सौ. स्वाती बाराहाते यांनी केले. तसेच ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेसचे प्रसाद जमदाडे, डॉ. देवेश कुमार बाराहाते, एबीसी क्रीडा मंडळाचे चंद्रशेखर म्हस्के, मुकुंद काशीद, सचिन अग्रवाल, ओमसिंग बायस, पियुष लुंकड, मार्शल पिल्ले, हर्षल शेलोत यांच्यासह अनेक क्रीडारसिक व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यातील बास्केटबॉल खेळाला नवी चालना मिळेल, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला. भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील, असे अकॅडमीचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर यांनी सांगितले.

### सीए रमेश फिरोदिया यांचा मुंबईत जेसीएएफ जीवन गौरव पुरस्काराने सन्मान



**अहिल्यानगर :** नगरमधील प्रथितयश उद्योजक तथा सीए रमेश फिरोदिया यांना जैन चार्टर्ड अकाउंटंट फेडरेशनचा (जेसीएएफ) जैन सीए जीवन गौरव पुरस्कार प्राप्त झाला आहे. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल सी.ए. रमेश फिरोदिया यांना मुंबई येथे या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी जेसीएएफचे चेअरमन सीए एम.जी. भंडारी, अध्यक्ष सीए शांतीलाल कोचर, उपाध्यक्ष सीए प्रदीप कापडिया, सीए अमृत पोरवाल, सीए जयेश काला, सीए पुनित मेहता, सीए विद्युत जैन आदींसह देशभरातील जैन सीए उपस्थित होते. संगमनेर तालुक्यातील साकूर हे फिरोदिया यांचे मूळ गाव. जीवनात प्रगती करायची तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे त्यांनी लहान वयात उमजले. त्यामुळे त्यांनी बी.कॉम. ऑनर्स पदवी घेतल्यानंतर सी.ए.अभ्यासक्रमास प्रवेश घेवून अतिशय कठीण अशी ही पदवी मिळवली. १९७० पासून ते एक कुशल सनदी लेखापाल म्हणून प्रॅक्टिस करीत आहेत. आपल्या व्यवसायात यशोशिखरावर पोहचतानाच फिरोदिया यांनी कायम सामाजिक बांधिलकी जपण्यावर भर दिला आहे. त्यांनी आपल्या साकुर गावात शिक्षणाची गंगोत्री आणण्यासाठी महाविद्यालय सुरु केले. साकूर येथील रमेश फिरोदिया आर्टस, सायन्स ण्ड कॉमर्स ज्युनियर कॉलेज संस्थेचे ते चेअरमन असून या संस्थेत आजमितीस तब्बल ८०० मुले चांगले शिक्षण घेत आहेत. मुंबईस्थित रमेश फिरोदिया एज्युकेशनल ट्रस्टचे ते विश्वस्त आहेत.

### आदित्य क्षीरसागर यांची थर्ड डॅन ब्लॅक बेल्ट परीक्षेत उल्लेखनीय यश

**अहिल्यानगर :** बारामती येथे दिनांक १६ व १७ मे २०२६ रोजी पार पडलेल्या डॅन ग्रेडेशन परीक्षेमध्ये अहिल्यानगर येथील युवा कराटे प्रशिक्षक सेन्सेई आदित्य क्षीरसागर यांनी उल्लेखनीय यश संपादन करत थर्ड डॅन बेल्ट परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे. त्यांच्या या यशामुळे क्रीडा व कराटे क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आदित्य क्षीरसागर हे अचिव्हर्स स्पोर्ट्स अकॅडमीचे संस्थापक व प्रशिक्षक असून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना कराटेचे प्रशिक्षण देत राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडविण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. मेहनत, सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी कराटे क्षेत्रातील मानाचा समजला जाणारा थर्ड डॅन ब्लॅक बेल्ट हा टप्पा गाठला आहे. ही परीक्षा ट्रॅडिशनल शोतोकान अँड स्पोर्ट्स कराटे ऑर्गनायझेशन (टी.एस.एस.के.ओ इंडिया) चे अध्यक्ष शिहान रवींद्र कराळे तसेच टेक्निकल डायरेक्टर शिहान विनय बोढे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# साथी पोर्टलमुळे बियाणे व्यवहारात पारदर्शकता; शेतकऱ्यांना गुणवत्तेची खात्री

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : राज्यात बियाण्यांच्या वाढत्या वापरासोबत बनावट, कालबाह्य आणि अनधिकृत बियाण्यांच्या समस्येमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत होते. बियाण्यांची गुणवत्ता, उपलब्धता आणि वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्राच्या सहकार्याने साथी (Seed Authentication, TA°aceability and Holistic InventoA°y) पोर्टल विकसित केले आहे. या डिजिटल प्रणालीमुळे बियाण्यांच्या संपूर्ण प्रवासाची नोंद ठेवणे शक्य होत असून शेतकऱ्यांना खात्रीशीर आणि गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

देशात दरवर्षी तृणधान्ये, कडधान्ये, कापूस, सोयाबीन, भाजीपाला आदी विविध पिकांसाठी मोठ्या प्रमाणावर बियाण्यांची देवाण-घेवाण होते. मात्र यामध्ये अधिकृत व बनावट बियाणे ओळखणे कठीण जात होते. बियाण्याच्या पिशवीत नमूद केलेले गुणधर्म प्रत्यक्षात मिळतील याची हमी नसल्याने उत्पादन घटण्याबरोबरच शेतकऱ्यांचा खर्च वाया जात होता. तसेच शासनालाही बियाण्यांच्या उपलब्धतेची अचूक माहिती मिळत नव्हती. एका भागात तुटवडा तर दुसऱ्या भागात अतिरिक्त साठा अशी परिस्थिती निर्माण होत होती. या पार्श्वभूमीवर साथी पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे.

उत्तम दर्जाच्या आणि जनुकीयदृष्ट्या सुधारित बियाण्यांमुळे पीक उत्पादनात सुमारे २० टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते. मात्र बनावट व निकृष्ट बियाण्यांमुळे शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागत होते. ही समस्या दूर करण्यासाठी साथी पोर्टलची अंमलबजावणी सन २०२३ पासून टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आली असून २५ एप्रिल २०२५ पासून सत्यप्रत बियाणे प्रणालीला शासनाची मान्यता मिळाली आहे.

> **योग्य बियाणे योग्य वेळी योग्य शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी समन्वय, पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर अत्यावश्यक आहे. साथी पोर्टलमुळे राज्यातील शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध होऊन उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होईल.**
>
> **- कृषी आयुक्तालय,**
> **कृषी उपसंचालक (बियाणे) डॉ. प्रीती सवाईराम.**

साथी पोर्टल हे केवळ माहिती व्यवस्थापन प्रणाली नसून शेतकरी, बियाणे उत्पादक, वितरक आणि शासन यांना जोडणारे एक प्रभावी डिजिटल व्यासपीठ ठरत आहे. या पोर्टलमध्ये बियाण्याच्या उत्पादनापासून विक्रीपर्यंतचा संपूर्ण इतिहास नोंदवला जातो. प्रत्येक बियाणे लॉटला स्वतंत्र क्यूआर कोड देण्यात येत असून त्याद्वारे बियाण्याचा उगम, गुणवत्ता आणि वितरण साखळी सहज तपासता येते. त्यामुळे ट्रेसिबिलिटी, पारदर्शकता आणि गुणवत्ता नियंत्रण सुनिश्चित होत आहे.

बियाणे उत्पादक आणि वितरकांसाठीही ही प्रणाली उपयुक्त ठरत आहे. बनावट व अनधिकृत बियाण्यांवर नियंत्रण, वितरण व्यवस्थापन, खर्च आणि वेळेची बचत, विक्रीवरील नियंत्रण, एकत्रित डेटा बँक, वितरण साखळीचे नियोजन, तक्रार निवारण आणि कायदेशीर प्रक्रियेचे पालन यासाठी पोर्टल मदत करत आहे. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील नेटवर्किंगमुळे व्यवसाय वृद्धीलाही चालना मिळत आहे. बियाणे विक्रेत्यांनी https://seedtace.gov.in या संकेतस्थळावर लॉगिन करून महाराष्ट्र राज्य निवडावे. लॉगिन आयडी, पासवर्ड आणि कॅप्चा प्रविष्ट केल्यानंतर प्रथम प्रोफाईल अद्ययावत करणे आवश्यक आहे. या प्रणालीमध्ये विक्रेते, शासकीय संस्था आणि शेतकरी असे तीन प्रकारचे वापरकर्ते आहेत. शेतकऱ्यांना बियाणे विक्री करताना फार्मर आयडी नमूद करणे बंधनकारक असून तो उपलब्ध नसल्यास पूर्ण नाव आणि भ्रमणध्वनी क्रमांक नोंदवावा लागतो. राज्यातील बियाणे उत्पादक आणि विक्रेता संघटनांच्या सूचनांनुसार पोर्टलमध्ये अनेक तांत्रिक सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये लॉटनिहाय ट्रॅकिंग प्रणाली, प्रत्येक बॅग स्वतंत्र स्कॅन करण्याची आवश्यकता नसलेली सुलभ विक्री प्रक्रिया, टॅलीसारख्या ईआरपी प्रणालीसोबत एकत्रीकरण, ॲग्रीस्टॅक एपीआयद्वारे फार्मर आयडी आधारित माहितीची उपलब्धता, SATHI-SaleEasy मोबाईल ॲपद्वारे विक्री नोंदणी आणि बियाणे नियंत्रण आदेश १९८३ अंतर्गत फॉर्म डी सादर करण्याची सुविधा यांचा समावेश आहे.

# इंधन दरवाढ, नीट पेपर फुटीविरोधात समाजवादी पार्टीचे आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : वाढती महागाई, पेट्रोल-डिझेल व घरगुती गॅसच्या वाढत्या किमती तसेच शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार आणि नीट पेपर फुटीच्या निषेधार्थ समाजवादी पार्टी, पुणे शहरच्या वतीने कलाकार कट्टा, गुडलक चौक येथे तीव्र आंदोलन करण्यात आले.

आंदोलनादरम्यान प्रतीकात्मक स्वरूपात चुलीवर स्वयंपाक करून इंधन दरवाढीचा निषेध व्यक्त करण्यात आला. तसेच नीट पेपर फुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ होत असल्याचा आरोप करत विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ निदर्शने करण्यात आली. आंदोलकांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करत सामान्य जनतेवरील वाढत्या आर्थिक भाराबद्दल नाराजी व्यक्त केली.




समाजवादी पार्टी पुणे शहराध्यक्ष जांबुवंत मनोहर यांनी इंधन तुटवडा व सातत्याने वाढणारे इंधन दर हे केंद्र सरकारच्या अपयशी धोरणांचे परिणाम असल्याचा आरोप केला. इंधन संकटाचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत असून महागाईमुळे नागरिकांचे जीवन कठीण झाले असल्याचे त्यांनी सांगितले. सरकारने तात्काळ इंधनावरील अतिरिक्त कर कमी करून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा गादी उतार व्हा, असा इशारा त्यांनी दिला.

नीट पेपर फुटीच्या प्रकरणावर आंदोलनकर्त्यांनी तीव्र संताप व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित जबाबदार केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनात समाजवादी पार्टी पुणे शहराध्यक्ष जांबुवंत मनोहर, जिल्हाध्यक्षा साधना शिंदे, दत्ता पाकीरे, विनायक लांबे, अशोकराव गायकवाड, इब्राहिम यवतमाळवाले, भारत मालुसरे, सलिम बडगेर, धम्मपाल अडसूळ तसेच युक्रांद, लाल बावटा आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. समाजवादी पार्टीच्या वतीने जनतेच्या प्रश्नांवर पुढील काळातही संघर्ष सुरू ठेवण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

# ''भारत विकास परिषद'' तर्फे दिव्यांग व्यक्तींसाठी कृत्रिम पाय मोजमाप शिबिर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पुणे** : भारत विकास परिषद दक्षिण पुणे व पिंपरी चिंचवड शाखेतर्फे सहकारनगर, पुणे येथील '' स्व - आधार'' दिव्यांग मदत केंद्रात दिव्यांग बांधवांसाठी, भगींनीसाठी कृत्रिम पाय मोजमाप शिबिर उत्साहात संपन्न झाले. या शिबिरात १७ दिव्यांग बांधवांचे मोजमाप करण्यात आले असून लाभार्थ्यांना अत्याधुनिक लॅमिनेशन तंत्रज्ञानाद्वारे तयार करण्यात येणारे कृत्रिम पाय पूर्णतः मोफत बसवून देण्यात येणार आहेत. या कृत्रिम पायांची बाजारातील किंमत सुमारे रुपये ५० ते रुपये ७० हजार इतकी असून,भारत विकास परिषदे मार्फत सेवाभावी वृत्तीने व सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमामुळे दिव्यांग बांधवांना,भगिनींना आपल्या दैनंदिन जीवनात अधिक स्वावलंबी व स्वनिर्भर होण्यास मदत होणार असून,त्यांच्या जीवनात नव्या आशा व आत्मविश्वासाची भर पडणार आहे. भारत विकास परिषद दक्षिण पुणे व पिंपरी चिंचवड शाखेच्या वतीने अशा प्रकारचे शिबीर दर महिन्याला आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.कृत्रिम पाय व इतर सहाय्याबाबत व नाव नोंदणीसाठी इच्छुकांनी संपर्क क्रमांक जयंत जेस्ते ९८२२५१०३४९ या मोबाईलवर संपर्क साधावा,असे आवाहन भारत विकास परिषदेतर्फे करण्यात आले आहे.

# ऑनलाईन औषध विक्रीविरोधात २० मे रोजी औषध विक्रेत्यांचा देशव्यापी बंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री आणि कॉर्पोरेट कंपन्यांकडून होत असलेल्या अव्यावसायिक स्पर्धेविरोधात अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने (अखजडू) दि. २० मे २०२६ रोजी देशव्यापी बंदची घोषणा केली आहे. देशभरातील सुमारे १२.५० लाख औषध विक्रेते या बंदमध्ये सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे पुणे अध्यक्ष संदीप पारख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी संघटनेचे पुणे सेक्रेटरी अनिल बेलकर, खजिनदार रोहित करपे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

अधिक माहिती देताना पारख म्हणाले, औषध व्यवसाय हा ृऑॅसी रपव ऊैशींळली अलीं १९४० आणि ठींश्रश १९४५ अंतर्गत नियंत्रित केला जातो. मात्र ऑनलाईन औषध विक्रीसंदर्भात अद्याप स्पष्ट कायदेशीर तरतूद नसताना देशभरात मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन विक्री सुरू आहे. याविरोधात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल असून न्यायालयाने ऑनलाईन औषध विक्रीस स्थगिती दिलेली असतानाही सरकारकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

कोरोना काळात औषधांची होम डिलिव्हरी करण्यासाठी सरकारने तात्पुरती सूट दिली होती. मात्र महामारी संपल्यानंतरही ती मागे घेण्यात आलेली नाही. या परिस्थितीचा फायदा घेत ऑनलाईन कंपन्या मोठ्या प्रमाणात सवलती देत बाजारपेठ ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. यामुळे लहान औषध विक्रेत्यांचे अस्तित्व धोक्यात आले असून ग्रामीण भागातील औषध वितरण व्यवस्थेवरही परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली. अंतर्गत औषध विक्रेत्यांसाठी निश्चित नफा मर्यादा ठेवण्यात आली आहे. मात्र कॉर्पोरेट कंपन्या २० ते ५० टक्क्यांपर्यंत सवलत देत असल्याने पारंपरिक औषध विक्रेते स्पर्धेत टिकू शकत नसल्याचे जगन्नाथ शिंदे यांनी सांगितले. तसेच डॉक्टरांनी लिहिलेल्या औषधांच्या पर्यायी ब्रँड देण्याचा अधिकार औषध विक्रेत्यना द्यावा, अशी मागणीही संघटनेने केली आहे. संघटनेने केंद्र सरकार, संबंधित मंत्री आणि अधिकाऱ्यांकडे वारंवार निवेदने देऊनही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे संघटनेने स्पष्ट केले. महाराष्ट्रात हा बंद शंभर टक्के यशस्वी होईल,



# कोथळे प्रशालेचा 'मिशन २०२६' शैक्षणिक आराखडा जाहीर

## पायाभूत सुविधा आणि पर्यावरण संवर्धनावर मोठा भर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड** : ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि बदलत्या काळाची पावले ओळखून विद्या महामंडळ प्रशाला कोथळे येथे पुढील वर्षाच्या शैक्षणिक नियोजनासाठी संचालक मंडळाची उच्चस्तरीय बैठक संपन्न झाली. अत्यंत सकारात्मक आणि उत्साही वातावरणात पार पडलेल्या या बैठकीत केवळ शैक्षणिक विषयांवरच चर्चा झाली नाही, तर शाळेच्या भौतिक गरजा आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित महत्त्वपूर्ण प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. वाढदिवसाचा स्नेह सोहळा ठरला मुख्य आकर्षणया महत्त्वाच्या बैठकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, पुरंदर नागरी सहकारी पतसंस्थेचे व्यवस्थापक आणि प्रशालेचे ार्यतत्पर संचालक सतिश वसंत शिंदे यांचा वाढदिवस यावेळी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



संस्थेचे अध्यक्ष विजय विलास जगताप, उपाध्यक्ष पोपट भगवान भोसले आणि सचिव प्रमोद बापू संपत जगताप यांच्या हस्ते शिंदे यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना कोषाध्यक्ष तुषार चंद्रकांत खैरे आणि सहसचिव राजेंद्र महादेव जगताप, संचालक पांडुरंग बबन जगताप यांनी सतिश शिंदे यांच्या व्यवस्थापकीय कौशल्याचे कौतुक केले. मुख्याध्यापक प्रशांत कदम आणि लेखनिक रामचंद्र ज्ञानोबा भोसले यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्यांना दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

पायाभूत सुविधांचा कायापालट: वर्गखोल्यांची दुरुस्ती आणि स्वच्छता गृह बैठकीत प्रशालेच्या जुन्या इमारतीचा प्रश्न प्रामुख्याने चर्चिला गेला. पावसाळ्यापूर्वी शाळेच्या जुन्या खोल्या व वर्गांची दुरुस्ती पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला. या कामावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी संचालक पांडुरंग बबन जगताप आणि संचालक सतिश वसंत शिंदे यांनी घेतली आहे.

त्याचप्रमाणे, प्रशालेत शिकणाऱ्या मुलींच्या आरोग्यासाठी आणि स्वच्छतेसाठी एक नवीन, आधुनिक सोयी-सुविधांनी युक्त शौचालय तातडीने उभारण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. यामुळे विद्यार्थिनींना शाळेत अधिक सुरक्षित वातावरण लाभणार आहे.

पालकांना दिलासा: परीक्षा फीचे संतुलित नियोजन नवीन शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी प्रवेश वाढवण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली जाईल. ग्रामीण भागातील पालकांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन, परीक्षा फी संदर्भात अत्यंत संवेदनशीलतेने निर्णय घेण्यात आला. फी वाढ न करता, सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना परवडेल अशा पद्धतीने आर्थिक नियोजन करण्याचे सर्वानुमते ठरले.

निसर्गशाळा: वृक्षारोपण आणि 'परसबाग' प्रकल्प पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकता यावे, यासाठी यावर्षी प्रशालेत दोन मोठे पर्यावरणपूरक उपक्रम सुरू केले जात आहेत: १. शाश्वत वृक्षारोपण: शालेय परिसर हिरवागार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर झाडे लावून ती जगवली जातील.

२. शालेय परसबाग (किचन गार्डन): शालेय परिसरातील मोकळ्या जागेत विद्यार्थ्यांच्या मदतीने सेंद्रिय भाजीपाला पिकवला जाईल. हा भाजीपाला विद्यार्थ्यांच्या माध्यान्ह भोजनासाठी वापरला जाणार असल्याने त्यांना शेतीचे धडे आणि सकस आहार दोन्ही एकत्र मिळतील. सहकार आणि शिक्षणाची युती पतसंस्थेच्या व्यवस्थापनाचा शाळेला फायदा पुरंदर नागरी पतसंस्थेचे व्यवस्थापक सतिश शिंदे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. एका बाजूला पतसंस्थेचे चोख व्यवस्थापन सांभाळत असताना, शाळेच्या विकासासाठी आणि आर्थिक नियोजनासाठी त्यांचे मार्गदर्शन नेहमीच मोलाचे ठरत असल्याची भावना शिक्षकांनी व्यक्त केली. ध्यक्षीय मनोगत ''आजची बैठक कोथळे प्रशालेच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरेल. आम्ही केवळ पायाभूत सुविधा सुधारत नाही आहोत, तर 'परसबाग' आणि 'वृक्षारोपण' यांसारख्या प्रकल्पांतून विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाची मूल्ये रुजवत आहोत. सर्व पदाधिकारी, संचालक आणि कर्मचाऱ्यांच्या एकजुटीमुळे पुढील वर्षाची सर्व कार्यवाही यशस्वीपणे पूर्ण होईल.''
- विजय विलास जगताप (अध्यक्ष, विद्या महामंडळ प्रशाला कोथळे) फोटोओळ:- विद्या महामंडळ प्रशाला कोथळे येथील वार्षिक नियोजन बैठकीत संचालक सतिश शिंदे यांचा अभिष्टचिंतन सोहळा संपन्न. यावेळी शालेय विकासाच्या विविध योजनांवर शिक्कामोर्तब करण्यात आले.

द•ख•ल

## गटई कामगारांना १०० टक्के अनुदानावर पत्र्याचे स्टॉल अर्जाची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६

**पुणे** : सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील चर्मकार व्यवसाय करणाऱ्या गटई कामगारांसाठी पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत गटई काम करताना ऊन व पावसापासून संरक्षण मिळावे यासाठी १०० टक्के अनुदान तत्वावर पत्र्याचे स्टॉल तसेच कमाल ५ हजार रुपये इतके अनुदान डीबीटीद्वारे देण्यात येणार आहे. या योजनेसाठी अर्जदार अनुसूचित जाती अथवा नवबौद्ध प्रवर्गातील असून त्यांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी नसावे. अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न शहरी भागासाठी १ लाख रुपये व ग्रामीण भागासाठी ८० हजार रुपयांपेक्षा जास्त नसावे. अर्जदाराने स्टॉलसाठी मागितलेली जागा ग्रामपंचायत, नगरपालिका, छावणी बोर्ड किंवा महानगरपालिकेकडून अधिकृतरित्या भाडे, करार, खरेदी अथवा मोफत ताब्यात दिलेली असावी किंवा ती स्वमालकीची असावी. संबंधित जागेचा अर्जदाराच्या नावाचा चालू ७/१२ उताराही आवश्यक राहणार आहे. अर्जासोबत सक्षम प्राधिकाऱ्याचा जातीचा दाखला जोडणे आवश्यक आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सामाजिक न्याय भवन, सर्वे नं. १०४/१०५, विश्रांतवाडी पोलिस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे - ४११००६ येथे अर्ज सादर करावेत. अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ असून अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२०-२९७०६६११ वर संपर्क साधावा.

## आदिवासी कलावंतांना प्रोत्साहन देण्यासाठी वारली पेंटिंग कार्यशाळा

**पुणे** : आदिवासी समाजातील वारली जमातीची चित्रकला ही अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण, आकर्षक आणि अद्वितीय मानली जाते. वारली पेंटिंगने आज देशाच्या सीमा ओलांडून आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या पारंपरिक कलेला अधिक प्रोत्साहन मिळावे आणि आदिवासी कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या वतीने २१ मे २०२६ पर्यंत वारली चित्रकला कार्यशाळेचे आयोजन यश रेजेंसी, ४१२-सी, के. एम. मुन्शी रोड, लक्ष्मी सोसायटी, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे येथे आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेमध्ये पालघर जिल्ह्यातील डहाणू, तलासरी, पालघर तालुक्यातील तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील अनुसूचित जमातीतील वारली चित्रकार सहभागी झाले आहेत. ही कार्यशाळा केवळ चित्रकार आणि कलावंतांना प्रोत्साहन देणारी नसून उद्योजक, व्यावसायिक तसेच कला क्षेत्रातील गुंतवणूकदारांसाठीही उपयुक्त ठरणार आहे. व्यवसाय व उद्योगांच्या ब्रँडिंगसाठी वारली चित्रकलेचा प्रभावी वापर करता येऊ शकतो. उद्योजक, व्यावसायिक तसेच कलाप्रेमींनी या कार्यशाळेस भेट देऊन आदिवासी कलेला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन मंजिरी मनोलकर, आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी केले आहे.

## पुणे जिल्ह्याची स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणूक जाहीर ; आचारसंहिता लागू

**पुणे** : भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील द्वैवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठीही निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच संबंधित मतदारसंघात आचारसंहिता तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे. जाहीर कार्यक्रमानुसार २५ मे २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध होणार असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख १ जून २०२६ आहे. अर्जांची छाननी २ जून रोजी होईल, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ४ जून २०२६ निश्चित करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी मतदान १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत होणार आहे. मतमोजणी २२ जून २०२६ रोजी होणार असून २५ जूनपूर्वी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगाने संबंधित प्रशासनाला आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## आळंदीतील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी स्वयंशिस्त आवश्यक : नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे

**आळंदी** : आळंदीतील वाढती वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी प्रशासनासोबतच नागरिकांनी स्वयंशिस्त पाळणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी केले. आळंदी शहरातील विविध मुख्य व मंदिर परिसर तसेच प्रमुख रस्त्यांवर वाढणारी वाहतूक कोंडी, अनधिकृत पार्किंग आणि अतिक्रमणाच्या समस्यांबाबत धर्मशाळा, मंगल कार्यालय चालक-मालक, सर्वपक्षीय पदाधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपस्थित कार्यालय चालक-मालक, सर्वपक्षीय नेते आणि लोकप्रतिनिधींनी शहरातील वाहतूक समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी विविध सूचना मांडल्या. त्यामध्ये आळंदी बायपास मार्ग तातडीने सुरू करणे, वाहनतळांची संख्या वाढवणे, रस्त्यावरील फुटपाथ अतिक्रमणमुक्त करणे, शहरात दिशादर्शक व रस्ता मार्गदर्शक फलक उभारणे, तसेच पार्किंग व्यवस्थेचे काटेकोर नियोजन करणे आदी मागण्यांचा समावेश होता. नगराध्यक्ष कुऱ्हाडे यांनी सांगितले की, आळंदी ही धार्मिक व भाविकांची नगरी असल्याने शहरात दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. त्यामुळे प्रशासनाने उपाययोजना राबविण्यासोबतच नागरिकांनीही वाहतुकीचे नियम पाळणे आवश्यक आहे. सर्वांच्या सहकार्यानेच शहरातील वाहतूक कोंडीवर प्रभावी तोडगा निघू शकतो, असे त्यांनी नमूद केले. यावेळी उपनगराध्यक्ष सुजाता तापकीर, वरिष्ठ पोलीस अधिकारी बी.एस.नरके, वाहतूक शाखेचे सतीष नांदूकर सर, मुख्याधिकारी माधव खांडेकर, आजी-माजी नगरसेवक, सर्वपक्षीय पदाधिकारी, लग्न कार्यालय चालक-मालक तसेच आळंदीकर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षक मतदारसंघाच्या आखाड्यात 'नंदकुमार सागर' यांच्या नावाची चर्चा

## पुण्यात शिक्षक संघटना शक्तीप्रदर्शनाच्या तयारीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे** : आगामी पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीचे बिगुल वाजण्यापूर्वीच राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महासंघाचे सचिव प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या उमेदवारीची चर्चा आता राजकीय वर्तुळासोबतच थेट शिक्षक आणि मुख्याध्यापकांच्या शाळा-शाळांमध्ये पोहोचली आहे. शिक्षण क्षेत्रातील दीर्घ अनुभव आणि संघटनात्मक कार्याचा मोठा पाठींबा पाठीशी असल्यामुळे भाजपच्या गोटातून नंदकुमार सागर यांच्या नावाला पहिली पसंती मिळण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.



पुण्याच्या भाजप कार्यालयात शिक्षक नेत्यांची मांदियाळीशिक्षक आणि शाळांच्या प्रलंबित प्रश्नांवरून सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आणि प्राचार्य सागर यांच्या उमेदवारीला वजन देण्यासाठी पुणे येथील भाजप कार्यालयात राज्यातील आघाडीच्या मुख्याध्यापक आणि शिक्षक संघटनांनी एकत्रित हजेरी लावली. भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या वतीने प्रमुख मार्गदर्शक संतोष साखरे यांनी शिक्षक प्रतिनिधींची भेट घेऊन त्यांच्या मागण्यांचे निवेदन स्वीकारले.

यावेळी पुणे जिल्हा आणि शहर मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी, आश्रमशाळा महासंघाचे प्रतिनिधी आणि महाराष्ट्र शिक्षक परिषदेचे नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनीच एका सुरात प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या अभ्यासू आणि सुसंस्कृत नेतृत्वाची पाठराखण करत त्यांना उमेदवारी देण्याची मागणी केली.

बलाढ्य संघटनांची वज्रमूठ; सागर यांच्यासाठी मोर्चेबांधणी सुरूया बैठकीला पुणे जिल्ह्यातील मातब्बर शैक्षणिक चेहरे उपस्थित होते. यामध्ये पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रसाद गायकवाड, कार्याध्यक्ष राजेश गायकवाड, शिरूरचे रामदास थिटे, बाळासाहेब चव्हाण, तसेच राष्ट्रपती पारितोषिक विजेते प्राचार्य कुंडलीक मेमाणे, राणी बांदल-मानकर आणि पुणे शहराध्यक्ष शिवाजी शिंदे यांचा समावेश होता. या सर्वच नेत्यांनी नंदकुमार सागर हेच शिक्षकांचे प्रश्न सभागृहात प्रभावीपणे मांडू शकतात, असा विश्वास व्यक्त केला.

> ''शिक्षण क्षेत्रातील आजचे प्रश्न सोडवण्यासाठी जुनाट पद्धती चालणार नाहीत. त्यासाठी संघटित आणि आक्रमक प्रयत्नांची गरज आहे. विद्यार्थी, शिक्षक आणि शैक्षणिक संस्थांचे हित जपायचे असेल, तर नेतृत्व सक्षम हवे. प्राचार्य नंदकुमार सागर यांच्याकडे ती दृष्टी आणि सखोल अभ्यास आहे. पुणे विभागाचे प्रश्न सोडवण्यास ते पूर्णपणे सक्षम आहेत.''
> - तुकाराम बेनके (संचालक, मुंबई सेकंडरी सोसायटी) शिक्षक मतदारसंघावर पकड मिळवण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. मात्र, शिक्षक आणि मुख्याध्यापक महासंघाचे थेट पाठबळ असल्यामुळे प्राचार्य नंदकुमार सागर यांचे पारडे सध्या जड मानले जात आहे. ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागातील शिक्षकांमध्ये त्यांचा दांडगा जनसंपर्क असून, संघटनांनी घेतलेल्या या आक्रमक भूमिकेमुळे भाजप श्रेष्ठींना त्यांच्या नावाचा गांभीर्याने विचार करावा लागणार आहे, हे मात्र नक्की!

# संत निरंकारी फाउंडेशनतर्फे ओतूर येथे रक्तदान शिबीर व सत्संग संपन्न; ७५ जणांचे रक्तदान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा,**: 'नर सेवा, नारायण पूजा' आणि 'रक्त नाड्यांमध्ये वाहावे, नाल्यांमध्ये नाही' या ब्रीदवाक्याला जागून संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने ओतूर(ता. जुन्नर )येथे भव्य रक्तदान शिबीर व आध्यात्मिक सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते . या उपक्रमात अंदाजे ७५ निरंकारी भक्त व नागरिकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदानाला सहभाग नोंदवला आहे.

शिबिराचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद सदस्य मोहित ढमाले व प्रवीण भांबुर्डेकर यांच्या हस्ते करण्यात आल्याची माहिती मनोज तांबे यांनी दिली . यावेळी उपस्थित भाविकांना भांबूर्डेकर म्हणाले की संकट काळात संत निरंकारी मिशन नेहमीच समाजाच्या पाठीशी उभे राहते. संकलित झालेले ७५ युनिट रक्त संत निरंकारी ब्लड बँक, विलेपार्ले, मुंबई यांच्या वैद्यकीय पथकाने संकलित केले आहे . यसायंकाळी झालेल्या सत्संग सोहळ्यात मुंबईहून आलेले प्रचारक सोहन इंगवले यांनी मार्गदर्शन केले. ''अध्यात्म केवळ वर्षांचे नाही, तर तो अंतरीच्या प्रवासाचा मार्ग आहे. आपण देवाच्या किती जवळ पोहोचलो हे महत्त्वाचे आहे. वर्ष मोजण्यापेक्षा अंतर्गत बदल महत्त्वाचा असे प्रतिपादन त्यांनी केले . सद्गुरु सुदीक्षा महाराज यांच्या शिकवणीचा दाखला देत ते म्हणाले, ''घरातील पत्नी, मुलांमध्ये विठ्ठल दिसतो का, कामात परमात्म्याची जाणीव होते का, हीच खरी कसोटी आहे. ब्रह्मवेत्त्या सद्गुरूंकडून ब्रह्मज्ञान प्राप्त झाल्यावरच सर्वांमध्ये भगवंताचे रूप दिसते.'' असेही ते या वेळी म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल डोके यांनी केले तर आभार मनोज तांबे यांनी मानले.



द•ख•ल

## जाणता राजा प्रतिष्ठाण बेल्हे ठरला गवळीबाबा प्रिमिअर लीगचा विजेता..!



**निघोज :** धर्मरक्षक प्रतिष्ठाणचे संस्थापक पै.सुभाष वराळ पाटील व जिगर ग्रुप पाडळी आळे यांच्या मार्गदर्शनाखाली पाडळी आळे या ठिकाणी गवळीबाबा प्रिमिअर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पारनेर,जुन्नर,सिन्नर तालुक्यातील विविध संघांनी प्रवेश नोंदविला होता. स्पर्धेसाठी प्रथम क्रमांक ५००१, द्वितीय क्रमांक ३००१, तृतीय क्रमांक २००१ अशी बक्षीसे धर्मरक्षक प्रतिष्ठाणचे संस्थापक सुभाष वराळ यांच्या माध्यमातून देण्यात आली. स्पर्धेचा वितरण सोहळा धर्मरक्षक प्रतिष्ठाणचे संस्थापक सुभाष वराळ, सुनिल म्हस्के, मेजर विकास वराळ, विलास वराळ, लहू निश्चित, सुरेश डेरे, अशोक डेरे, विकास डेरे, गोरक्ष डेरे, सचिन डेरे, दगडू डेरे, रावसाहेब डेरे, शिवाजी क्षिरसागर, सुभाष डेरे, संपत कारभारी डेरे, सचिन मोरे, किरण चौधरी, संघर्ष मापारी, शरद कापसे, बाळाशेठ गुळवे, जय भुकन, हर्षद इधाटे, स्वप्निल आतकर तसेच धर्मरक्षक प्रतिष्ठाणचे सहकार्यांच्या उपस्थितीमध्ये पार पडला.

## बाईक रॅलीने 'स्वाभिमान दिन' साजरा



**लिंपणगाव :** वंचितांच्या हक्कासाठी सातत्याने लढणारे नेते प्रकाश आंबेडकर यांचा वाढदिवस श्रीगोंदा तालुक्यात 'स्वाभिमान दिन' म्हणून उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त भव्य मोटारसायकल रॅलीमुळे परिसर निळेमय झाला. वंचित बहुजन आघाडीचे संतोष जौंजाळ यांच्या नेतृत्वाखाली म्हसे येथून रॅलीला प्रारंभ झाला. 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. ही रॅली बेलवंडी येथे पोहोचली. यावेळी बेलवंडी पोलीस ठाण्यास भारतीय संविधानाची प्रस्तावना व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट देण्यात आली. सांगता सभेत ज्येष्ठ नेते दत्तात्रय सोनवणे, संतोष भोसले, पांडुरंग साळवे व सुखदेव फाजगे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी केक कापून अ‍ॅड. बाळासाहेब आंबेडकरांचा वाढदिवस साजरा केला. यावेळी महेंद्र थोरात, विठ्ठल हूलसर, रवींद्र जौंजाळ, सोमनाथ वंजारे, संतोष पठारे, अरुण पठारे, बापू गायकवाड, सोमनाथ पवार, रवींद्र चव्हाण, अक्षय फाजगे, बाबुराव शिंदे, तेजस जौंजाळ, आकाश गायकवाड, स्वप्नील जाधव, संदीप दिवटे, अनिल नेटवटे, बाबुराव रोकडे, ओम फाजगे, जगदीश गायकवाड, सागर गायकवाड, विशाल नेटवटे, पप्पू शिंदे, शेखर पवार व भीमसैनिक उपस्थित होते.

## राज्य शिक्षकेतर महासंघाचे कुरुमकर यांची भेट



**लिंपणगाव :** कौठा माध्यमिक विद्यालयाला राज्य शिक्षकेतर महासंघाचे प्रसिद्धी प्रमुख नंदकुमार कुरुमकर व चिभळे माध्य. विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय कोथिंबीरे, श्री सिद्धेश्वर माध्य. विद्यालयाचे मुख्याध्यापक भास्करराव जगताप, न्यू इंग्लिश स्कूल पिंपळसूटी येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक दिलीपराव देविकर यांनी सदिच्छा भेट दिली. या मान्यवरांचा विद्यालयाच्यावतीने मुख्याध्यापक दिलीपराव काटे यांनी सन्मान केला. यावेळी सहकारी सेवकमित्र उपस्थित होते. यावेळी नंदकुमार कुरुमकर यांनी विद्यालयाच्या सर्वांगीण विकासाबाबत माहिती घेतली. या विद्यालयाचा दरवर्षी एसएससी परीक्षेचा निकाल उत्कृष्ट लागला जातो. सहकार महर्षी बापूंच्या सूचनेनुसार विद्यालयाला नूतन इमारत लाभली. या खेडेगावात विद्यार्थ्यांना दहावीपर्यंत शिक्षण मिळते हे कौठा ग्रामस्थ व विद्यार्थ्यांचे भाग्य आहे. सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे व संस्थेच्या अध्यक्षा अनुराधा नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यालयाची मोठी प्रगती होताना दिसते.

## शंभूराजांच्या इतिहासाने शेवगावकर भावुक



**शेवगाव :** शेवगाव येथे शंभुराजे मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या हरिकीर्तन सेवेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पारंपारिक वाद्यांच्या गजरात, डीजेमुक्त आणि सुसंस्कृत वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय व भावनिक वातावरणाने भारावून गेला. मिरवणूक व कीर्तन सेवा शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. यावेळी पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी शंभुराजे मित्र मंडळाच्या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. डीजे मुक्त, पारंपारिक वाद्यांचा वापर करणारे आणि सुसंस्कृतपणाचे दर्शन घडवणारे असे आदर्श कार्यक्रम आजच्या काळाची गरज आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. हरिकीर्तन सेवेत ह.भ.प. तुकाराम महाराज भगत यांनी आपल्या ओजस्वी वाणीमधून छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनातील पराक्रम, त्याग आणि धर्मरक्षणासाठी दिलेल्या बलिदानाचे प्रभावी वर्णन केले. धर्माचे पालन करणे, पाखंड खंडण हेचि आम्हा करणे काम, बीज वाढवावे नाम या संत तुकाराम महाराजांच्या अभंगावर आधारित निरूपण करताना त्यांनी सांगितले की, आजच्या पिढीने शंभूराजांचा इतिहास फक्त वाचू नये, तर त्यांच्या धर्मनिष्ठा आणि स्वाभिमानाचा वारसा आपल्या आचरणात उतरवावा. कीर्तनादरम्यान संभाजी महाराजांच्या आयुष्यातील अंगावर शहारे आणणारे प्रसंग जिवंतपणे उभे करण्यात आले. स्वराज्य आणि धर्मासाठी त्यांनी सहन केलेल्या यातना तसेच अखेरच्या क्षणापर्यंत न झुकणारी त्यांची जिद्द ऐकताना अनेक भाविकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. कार्यक्रमास प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, युवक तसेच छत्रपती संभाजीनगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीगोंद्यात गुंतवणुकीच्या '१० टक्के व्याज' आणि '५० टक्के सोने'

### मल्टीनिधीच्या नावाखाली शेकडो कोटींचा संशयास्पद फंडा ; अनेक दिवसापासून परतावे मिळेना

**दादा सोनवने । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील पूर्व भागातील आढळगाव परिसरात सुरू असलेल्या एका मल्टीनिधी/मल्टीस्टेट संस्थेच्या माध्यमातून शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली मोठ्या आर्थिक गैरव्यवहार झाला आहे गुंतवणूकदारांना जादा परताव्याचे आमिष दाखवत, तसेच ५० टक्के रकमेत सोने देण्याचे प्रलोभन दाखवून शेकडो कोटी रुपये गोळा करून कंपनी पळून गेल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. अनेक एजंट गुंतवणूकदारांनरी तारीख पे तारीख देत असल्याची जोरदार चर्चा परिसरात रंगली आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील आढळगाव या ठिकाणी निधी लिमिटेड या नावाची फर्म उदयास आली ती फर्म गावातील काही शिक्षित मुले चालवत होती. यामध्ये शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावाखाली मोठ्या आर्थिक गैरव्यवहार झाला आहे गुंतवणूकदारांना जादा परताव्याचे आमिष दाखवत, तसेच ५० टक्के रकमेत सोने देण्याचे प्रलोभन दाखवून शेकडो कोटी रुपये गोळा करण्यात आले. यामध्येव धक्कादायक बाब म्हणजे, संबंधित संस्थेकडे सेक्युरिटी एक्सचेंज बोर्ड इंडिया म्हणजे (सेबी) किंवा भारतीय रिजर्व बँक (आरबीआय) यांची कोणतीही स्पष्ट परवानगी नसल्याचे आरोप होत आहे. अनेक गुंतवणूकदारांचे डिमॅट खाते क्रमांक नसतानाही केवळ ऑनलाइन परतावा दाखवून व्यवहार केल्याचा दावा केला गेला आहे. तालुक्यात यापूर्वी सिस्पे, समर्थ क्रॉप यांसारख्या योजनांमुळे अनेक गुंतवणूकदार फसल्याच्या घटना ताज्या असतानाच, आता निधी लिमिटेडच्या नावाखाली पुन्हा एकदा मोठा आर्थिक जाळे उभा राहिल्याची चर्चा आहे. संस्थेचे कार्यालय घरातूनच चालवले जात असल्याचे, तसेच संचालक मंडळात कुटुंबातील सदस्यांचा समावेश असल्याची माहिती समोर येत आहे. या संस्थेने श्रीगोंदा, अहिल्यानगर, पुणे,मुंबई, सोलापूर आणि बीड जिल्ह्यातील हजारो नागरिकांकडून तब्बल ३०० कोटी रुपयांहून अधिक निधी उभारल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. महिन्याला ५ ते १० टक्के परतावा आणि सोने या दुहेरी आमिषामुळे अनेकांनी मोठ्या प्रमाणावर पैसे गुंतवले आणि शेवटी फसलेच आता या कंपनीचे अनेक दिवसापासून परतावे बंद झाले आहेत आता जर परतावे बंद आले तर भरलेल्या रकमेच्या सोन्याचे काय असे अनेक प्रश्न गुंतवणूक करणाऱ्या लोकांसमोर उभे आहेत मात्र कंपनी गायब झाल्याची जोरदार चर्चा सुरू आहे मात्र तरीही एंजट अनेक वायदे करत या तारखेला तुम्हाला पैशे मिळतील असे वायदे करत तारखा बदलत आहेत.

**राजकीय शक्तीसाठी खटाटोप?**

निधी लिमिटेड नावाच्या कंपनीची स्थापना करून घरातील संचालक असल्यामुळे ही कंपनी फसवणूक करण्यासाठी बनवली असल्याने हे फक्त एका राजकीय नेत्यांसाठी ही कंपनी स्थापन केल्याची जोरदार चर्चा ऐकण्यास मिळत आहे.

**गुंतवणूकदारांना दिलासा कधी?**


अनधिकृत कंपन्यांमध्ये जादा परताव्याच्या आशेने गुंतवणूक करणारे नागरिक फसवणूक झाल्यानंतर पोलिसांत गुन्हे दाखल करतात; मात्र कारवाई कधी होणार आणि गुंतवलेली रक्कम परत कधी मिळणार? हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.

**जास्त परतावा धोक्याची घंटा ?**

आर्थिक तज्ज्ञांचे स्पष्ट मत १० टक्के महिन्याचे व्याज म्हणजे अलार्म बेल; इतका परतावा बाजारात नसतो, फक्त आमिष असते. त्यामुळे हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे असेही बोलले जात आहे

## 'सिस्पे' फसवणूक; एजंट संदीप रोडेला मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** श्रीगोंदा शहरातील बँक ऑफ महाराष्ट्र समोर घडलेल्या घटनेमुळे सिस पे फसवणूक प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. या प्रकरणातील एजंट संदीप विठ्ठल रोडे (रा. श्रीगोंदा) हे बँकेत ठेवलेले सोने सोडविण्यासाठी आले असताना, त्यांच्यावर अजिनाथ मोरे यांनी कथितरित्या मारहाण केल्याची घटना घडली.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, मारहाणीनंतर संदीप रोडे यांनी उपस्थित नागरिकांना काहीही करा, पैसे नाहीत; मी कायदेशीर मार्गाने लढतोय, असे सांगितल्याचे समोर आले आहे. या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, पोलिसांनी घटनेचा तपास सुरू केला आहे.सिस पे फसवणुकीत आधीच अनेक गुंतवणूकदारांचे पैसे अडकले असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड संताप आहे. आमचे पैसे कधी मिळणार? हा प्रश्न अजूनही अनुत्तरित असून, या घटनेनंतर नागरिकांच्या भावना अधिक तीव्र झाल्या आहेत.पैशांचा प्रश्न आहे आणि पैशाला भावनांचा ताप आला की रस्त्यावरची भाषा बदलते, अशी चर्चा आता श्रीगोंद्यात रंगू लागली आहे.

अनेकांना पोहचली मोठी झळ सिस्पे कंपनीमध्ये गुंतवणूक केल्यानंतर अनेकांच्या घरातील विवाह मोडले दुर्धर आजारातील व्यक्तींना उपचारा भावी मृत्यूला कवटाळावे लागले तसेच अनेक घरातील गोष्टी पैशाअभावी मोडून पडल्या आहेत त्यामुळे तालुक्यातील गुंतवणूकदाराच्या भावना मोठ्या प्रमाणात तीव्र असून याकडे पोलिसांनी लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

## देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याला विरोध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी :** राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०२६ या कायद्याच्या विरोधात पाथर्डीत महाराष्ट्र मंदिर महासंघ व विविध मंदिर प्रतिनिधींच्यावतीने तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांना निवेदन देण्यात आले.

हा कायदा हिंदू देवस्थानांच्या जमिनी, परंपरा आणि धार्मिक स्वायत्ततेवर गदा आणणारा असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. निवेदनात कायद्यामधील विविध तरतुदींवर आक्षेप नोंदवण्यात आले. हिंदू मंदिरांच्या जमिनींवरच कारवाई करून वक्फ बोर्डाच्या जमिनींना सूट देण्यात आल्याने संविधानातील समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन होत आहे. तसेच देवस्थानांच्या इनाम जमिनींवरील अतिक्रमणधारकांना मालकी हक्क देण्याची तरतूद मंदिरांच्या उत्पन्नावर परिणाम करणारी आहे. देवस्थानांच्या जमिनीवरील रस्ते, तलाव, विहिरी यांसारख्या सार्वजनिक वापराच्या जागा शासन मोबदल्याशिवाय ताब्यात घेणार असल्याबद्दलही नाराजी व्यक्त केली. महसूल अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरोधात दिवाणी न्यायालयात दाद मागता येणार नसल्याची तरतूद लोकशाहीविरोधी असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. शासनाने हा प्रस्ताव मागे घ्यावा, हरकती नोंदवण्यासाठी मुदतवाढ द्यावी तसेच देवस्थान जमिनींच्या संरक्षणासाठी गुजरातप्रमाणे अँटी लँड ग्रॅबिंग कायदा लागू करावा, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र मंदिर महासंघाचे कायदेशीर सल्लागार अ‍ॅड. नामदेव जायभाये, अ‍ॅड. दिनकरराव पालवे, अ‍ॅड. अंबादास शेळके, अ‍ॅड. शिवाजीराव दगडखैर, जवखेडचे अमोल वाघ, ऋषिकेश घाटूळ, आदिनाथ लंघे, अर्णव वाघ, घनशाम वाघ, भाऊराव धायतडक, तसेच अकोले येथील श्री दत्त मंदिर, पाथर्डी येथील श्री विजय हनुमान मंदिर व श्रीराम मंदिराचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## घामाच्या थेंबातून उभं राहतय खरीपाचं स्वप्न !

### बैलांच्या पाऊलखुणा हरवल्या ; ट्रॅक्टरच्या गर्जनेत खरीपाची लगबग

**शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री**



**नगर तालुका :** नगर तालुक्यातील बहुतांशी नागरीकांचा शेती मुख्य व्यवसाय असुन शेतीला पुरक दुग्ध, शेळीपालनाबरोबर इतर जोड व्यवसाय केले जातात. परंतु जवळपास सर्वच व्यवसायांचे आर्थिक गणित शेतीवरच अवलंबून असते अन् शेती संपुर्णपणे निसर्गावर अवलंबून असते निसर्गाच्या लहरीपणामुळे येथील शेतकरी नेहमीच संकटात सापडला जात असल्याचे चित्र दिसून येते. तरीदेखील मोठ्या जिद्दीने काळ्या भेगा पडलेल्या मातीत बळीराजा आशेचे बीज पेरत असतो.

ग्रामीण भागात खरीप हंगामाची चाहूल लागताच बळीराजा पुन्हा एकदा शेताकडे वळला आहे. कडक उन्हाची तीव्रता वाढलेली असतानाही शेतकरी पहाटेपासून संध्याकाळपर्यंत शेतामध्ये मशागतीच्या कामात व्यस्त असल्याचे चित्र सध्या सर्वत्र दिसून येत आहे. आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांना आता मान्सूनच्या आगमनाची आस लागली असून यंदाचा पाऊस चांगला पडू दे अशीच प्रार्थना गावोगावी ऐकू येत आहे.

पूर्वी बैलजोडीच्या साहाय्याने होणारी मशागत आता काळाच्या ओघात आधुनिक यांत्रिकीकरणाकडे वळली आहे. बैलांच्या गळ्यातील घंटांचा मंजुळ आवाज आणि शेतातील पारंपारिक नांगरणीचे दृश्य आता दुर्मिळ झाले आहे. त्याजागी ट्रॅक्टरच्या आवाजाने शिवार दणाणून गेले आहे. कमी वेळेत अधिक काम आणि मजुरांची टंचाई यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात ट्रॅक्टरद्वारे मशागतीला पसंती देत आहेत.

खरीप हंगामाच्या तयारीसाठी शेतकरी शेतातील जुनी पिकांचे अवशेष हटवणे, नांगरणी, कुळवणी, बांध दुरुस्ती तसेच पेरणीपूर्व तयारी करण्यात गुंतले आहेत. कडक उन्हामुळे अंगातून घामाच्या धारा वाहत असल्या तरी बळीराजाच्या चेहऱ्यावर खरीपाच्या आशेचे समाधान दिसत आहे. खरीप हंगाम हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. शेतकऱ्यांसाठी ही मशागत म्हणजे केवळ शेतीची तयारी नसून संसार उभा करण्याची धडपड आहे.

बदलणारे हवामान, वाढते खर्च, बियाणे व खतांच्या किमती यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडत असला तरी वरुणराजा कृपा करेल या आशेवर बळीराजा पुन्हा नव्या आशेने शिवारात उतरला आहे. बळीराजाच्या नजरा मान्सूनकडे लागल्या असून वेळेत आणि समाधानकारक पाऊस झाल्यास खरीप हंगामात चांगले उत्पन्न मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

गावरान कांद्याची काढणी झाली असून शेणखत टाकुन शेतात नांगरणीचे काम सुरु आहे. खरीप हंगामासाठी पेरणीपुर्व तयारी अंतिम टप्प्यात आहे. उष्णतेचा मशागत करताना खूप त्रास सहन करावा लागत आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतक-याचे आर्थिक गणित कोलमडले जाते. मागील भरपाई पुढच्या हंगामात होईल याच आशेवर बळीराजा उन, वारा, पावसाची तमा न बाळगता शेतात राबत असतो.

**सोपान आव्हाड**

मृग नक्षत्रात समाधानकारक पाऊस झाल्यास खरीप हंगामातील बाजरी, मुग, सोयाबीन सर्वच पिकांची पेरणी वेळेवर होऊन रब्बी हंगामातील पिकांचे नियोजन करता येते. मृग नक्षत्र ८ जुन तर आर्द्रा नक्षत्र २२ जुन रोजी सुरू होत आहे. या नक्षत्रातील पावसावरच खरीप पिकांचे भवितव्य अवलंबून असते. शेतीची मशागत पुर्ण झाली असुन आता वरुणराजाची प्रतिक्षा आहे.

**बाळासाहेब सोपान तवले**

## गावठी कट्टे बाळगणारा अट्टल गुन्हेगार जेरबंद : दोन पिस्टल जप्त



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** माहीजळगाव (ता. कर्जत) शिवारात गावठी कट्टे बाळगणारा युवक मुद्देमालासह कर्जत पोलिसांनी जेरबंद केला. नागेश्वर उर्फ नागेश महेंद्र पावरा असे अटक केलेल्या युवकाचे नाव आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रविवार, दि १७ रोजी कर्जत पोलीस उपविभागाचे पथक गस्त करीत असताना पोलीस कर्मचारी अमोल भैलुमे यांना चापडगाव ते माहीजळगाव हायवे रोडलगत कर्जत फाटा येथे एक युवक उभा असून त्याच्या हालचाली संशयास्पद वाटत असल्याची माहिती मिळाली. सदरची माहिती भैलुमे यांनी तात्काळ पोलीस उपअधीक्षक प्रवीण लोखंडे यांना दिली. प्राप्त माहितीची शहानिशा करून त्याची चौकशी केली असता प्रथमदर्शनी त्याने उडवा-उडवीची उत्तरे दिली. मात्र पोलिसांनी त्याची झाडाझडती घेतला असता त्याच्या पाठीवरील बॅगेत कर्जत पोलिसांना दोन गावठी कट्टे ( अग्निशस्त्र/ पिस्टल) व दोन जिवंत काढतुस मिळून आले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने आपले नाव नागेश्वर उर्फ नागेश महेंद्र पावरा (वय २१, बुडकी- बुराडी ता. शिरपूर, जिल्हा धुळे) सांगितले. झडतीमध्ये मिळून आलेले गावठी कट्टे त्याने विक्री करीता आणले असल्याचे पोलिसांकडे कबुल केले. सदर इसमाविरुद्ध धुळेसह इतरत्र गुन्हे दाखल असून तो अट्टल गुन्हेगार असल्याची माहिती कर्जत पोलिसांनी दिली. सदरची कारवाई जिल्हा अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक प्रवीण लोखंडे, पोलीस हवालदार अमोल भैलुमे, सागर जंगम, प्रताप देवकाते, मच्छिंद्र जाधव, प्रकाश दंदाडे यांनी पार पाडली.

## पाणलोट क्षेत्रात वाढ होणे गरजेचे : ना. विखे

### आम्ही टाकळीकर व नाम फौंडेशनच्या जलसंधारण कामाचा शुभारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पारनेर :** वाढत्या तापमानामुळे पाण्याची स्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. त्यामुळे जलसंवर्धन चळवळ राबवून पाणलोट क्षेत्रात वाढ होणे गरजेचे आहे. त्यासाठी आम्ही टाकळीकर व नाम फौंडेशनने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठान व नाम फौंडेशन यांच्यावतीने टाकळी ढोकेश्वर येथे राबविण्यात येणाऱ्या जलसंधारण कामाच्या दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ ना. विखे यांच्या हस्ते झाला. अध्यक्षस्थानी आ. काशिनाथ दाते होते.

स्वागत सरपंच तथा प्रशासक अरुणाताई खिलारी यांनी केले. आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे चाँद शेख यांनी विविध प्रकल्पांची माहिती दिली.

यावेळी ना. विखे म्हणाले, पाण्याचा संघर्ष दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे कायमस्वरूपी पाण्याची व्यवस्था होणे गरजेचे आहे. नजीकच्या राळेगण सिद्धी व हिवरे बाजार गावात अण्णा हजारे व पोपटराव पवार यांनी लोकसहभागातून जलक्रांती घडवून आणली. असे काम प्रत्येक गावात होणे गरजेचे आहे. आ. दाते यांनी तालुक्यात जलसंधारण कामे मोठ्या प्रमाणात सुरू केली. त्यांना शासन सर्व सहकार्य करेल. अशी ग्वाही दिली. यावेळी डॉ. बाळासाहेब बांडे, विशाल नगरे, प्रसाद जाधव, विश्वनाथ कोरडे, वसंत चेडे, राहुल शिंदे, विनायक देशमुख, रावसाहेब रोहोकले, डॉ. भाऊसाहेब खिलारी, प्रशांत गायकवाड, विलास झावरे, अशोक कटारिया, नारायण झावरे, मोहन रांधवण, शिवाजी खिलारी, संजय उदावंत, लताताई आल्हाट, दिगंबर शेळके, बाबासाहेब खिलारी, शरद झावरे, सनी सोनवणे, संदीप कोरडे, संतोष सोनावळे, प्रताप खिलारी, संदीप खिलारी, आदिनाथ पायमोडे, आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुसऱ्याच्या कामांचे उदघाटन कशाला?

### खा. नीलेश लंके यांचा पालकमंत्री विखेंवर हल्लाबोल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पारनेर :** पारनेर तालुक्यातील विविध विकासकामांच्या उदघाटन व भूमिपूजन कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर खा. नीलेश लंके यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर जोरदार टीका करत विकासकामांच्या श्रेयावरून थेट सवाल उपस्थित केला आहे.

कान्हुर पठार येथे आयोजित कार्यक्रमात खा. लंके बोलत होते. आपल्या जिल्ह्याचे आदर्श पालकमंत्री पारनेर तालुका दौऱ्यावर आहेत. तुम्ही स्वतःची कामे मंजूर करा आणि मग उदघाटन करा. नीलेश लंके यांनी मंजूर केलेल्या कामांचे उदघाटन कशाला करता? असा थेट सवाल खा. लंके यांनी उपस्थित केला.

खा. लंके म्हणाले की, पळशी येथे ७ कोटी रुपयांची आश्रमशाळा मी मंजूर करून बांधली. त्या शाळेचे उदघाटन ना. विखे पाटील यांच्या हस्ते होत आहे. तसेच पारनेरचे बसस्थानक आणि कोर्टाची इमारतही मी मंजूर करून आणली आहे. मात्र त्या कामांची पाहणी पालकमंत्री करत आहेत.

यावेळी त्यांनी अधिक आक्रमक भूमिका घेत, मी दुसऱ्याच्या कामांची पाहणीसुद्धा करत नाही आणि दुसऱ्याने मंजूर केलेल्या कामांवर जातही नाही. मी आमदार झाल्यापासून कोणाच्याही कामाचे खोटं उदघाटन केलेलं नाही. आपल्या झेंड्यावर छाती काढून मी पंढरपूरला जात असतो. दुसऱ्याच्या कामाचे चोरट्या भामट्यावाणी भूमिपूजन मी करत नसतो, असे म्हणत पालकमंत्री विखे पाटील यांना टोला लगावला.

तुम्ही तुमची कामे मंजूर करा आणि नंतर उदघाटन करा. तुमच्या राजकीय कारकिर्दीत काय केलं ते जनतेसमोर ठेवा. फक्त जिरवा-जिरवी केली. मात्र विकासाची ठोस कामे केली नाहीत. अशा शब्दांतही खा. लंके यांनी टीका केली. स्वतःच्या झेंड्यावर पंढरपूर करायला शिका. दुसऱ्याच्या झेंड्यावर पंढरपूर करू नका. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीवरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. आपला पारनेर तालुका स्वाभिमानी आहे आणि तो तसाच स्वाभिमानी ठेवावा, असे आवाहन त्यांनी केले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री



## राहुरी फॅक्टरीतील तरुणाचा अपघाती मृत्यू



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी फॅक्टरी येथील प्रसादनगर येथील करण लांडे या तरुणाचा दुर्दैवी अपघाती मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.

चिंचविहिरे रोडवरील राम मंदिराजवळ ही दुर्घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, करण लांडे हा तरुण मोटारसायकलवरून जात असताना अचानक वाहनावरील ताबा सुटल्याने त्याचा गंभीर अपघात झाला. अपघातात त्याच्या डोक्याला व शरीराला गंभीर मार लागला.

घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तत्काळ मदत करत त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे राहुरी फॅक्टरी परिसरात हळहळ व्यक्त होत असून, करण लांडे याच्या निधनाने शोककळा पसरली आहे.

## देवळाली प्रवरात जादूटोण्याच्या संशयाने खळबळ!

### घरातील वस्तू अचानक पेटत असल्याचा दावा; अंनिसचे मधुकर अनाप घटनास्थळी



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा गावातून जाणाऱ्या टाकळीमिया रोड परिसरातील कारवाडी येथे राहणारे सचिन रणधीर व साईनाथ रणधीर यांच्या घरात अचानक वस्तूंना आग लागत असल्याचा प्रकार समोर आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घरामध्ये लिंबू-मिरची तसेच काही संशयास्पद वस्तू आढळून आल्याने संबंधित कुटुंबीयांनी जादूटोणा केल्याचा संशय व्यक्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून घरातील कपडे, कागदपत्रे व इतर वस्तूंना अचानक आग लागत असल्याचे प्रकार घडत आहेत.

या घटनांमुळे कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष मधुकर अनाप यांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली. त्यांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन करत घटनामागील वैज्ञानिक कारणांचा शोध घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच कोणत्याही प्रकारच्या अंधश्रद्धेला बळी न पडता संयम बाळगण्याचे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान, या प्रकारामुळे परिसरात विविध चर्चांना उधाण आले असून नागरिकांमध्ये भीती आणि उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## कौटुंबिक वादातून पती-पत्नींकडून परस्परविरोधी गुन्हे दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : कौटुंबिक वादातून पती-पत्नी व दोन्ही कुटुंबीयांमध्ये झालेल्या मारहाणीप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. खंडाळा येथील रूपेश आंद्रेस अमोलिक यांची पत्नी समता हिच्या डोक्याला घरातील अँगल लागल्याने दोघांमध्ये किरकोळ वाद झाला होता. त्यानंतर समताच्या माहेरच्या मंडळींनी घरी येऊन लाकडी काठी व लोखंडी रॉडने मारहाण केल्याची फिर्याद रूपेश अमोलिक यांनी दिली आहे.

आमच्या मुलीला चांगले नांदवत नाही, असे म्हणत शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी नारायण गंगाधर विघावे, सुनिता विघावे, नंदा विघावे, भावड्या मधुकर, गणेश मधुकर व समता अमोलिक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, समता अमोलिक यांनीही पती रूपेश अमोलिक व त्याच्या नातेवाईकांविरोधात मारहाण व छळाची फिर्याद दिली आहे. चारित्र्यावर संशय घेत लोखंडी रॉड व लाकडी काठीने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

याप्रकरणी रूपेश अमोलिक, माया अमोलिक, कौशल्या अमोलिक व स्नेहा अमोलिक यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलिस करीत आहेत.

## परवानगीविना खतसाठा; वैजापूरमध्ये कृषी सेवा केंद्र चालकावर गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : कोणतीही अधिकृत परवानगी अथवा जागेचा परवाना न घेता मोठ्या प्रमाणात खतसाठा केल्याप्रकरणी वैजापूर पोलिस ठाण्यात एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी खत निरीक्षक तथा कृषी अधिकारी रवींद्र अशोक उराडे यांनी फिर्याद दिली आहे.

त्यांच्या फिर्यादीनुसार, दि. १८ मे रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास परसोडा येथील गट क्रमांक ९ मधील गणेश कृषी सेवा केंद्र येथे तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान संदीप फुलचंद बैनाडे (रा. परसोडा) यांच्याकडे कोणताही परवाना अथवा अधिकृत परवानगी नसताना खताच्या ९९१ बॅगचा साठा आढळून आला.

या खतसाठ्याची किंमत सुमारे ८ लाख ५३ हजार १९० रुपये इतकी असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी वैजापूर पोलिसांनी संदीप बैनाडे यांच्याविरोधात खत नियंत्रण आदेश १९८५ अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## पुतण्याचा खून करून फरार आरोपीला २४ तासांत अटक

### १० लाखांची रोकड जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : भांडगाव (ता. पारनेर) येथे सख्ख्या पुतण्याचा खून करून, तसेच घरातील रोकड घेऊन पसार झालेल्या आरोपीच्या पोलिसांनी २४ तासांत मुसक्या आवळल्या. महेश हनुमंत खरमाळे (वय ४५, रा.भुजवळवस्ती, भांडगाव, ता. पारनेर) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून १० लाख २९ हजार रुपयांची रोकड हस्तगत करण्यात आली आहे. स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली.

याप्रकरणी सिद्धेश संदीप खरमाळे (रा. भुजवळवस्ती, भांडगाव, ता. पारनेर) यांनी फिर्याद दिली होती. फिर्यादीचे वडील संदीप खरमाळे यांना कोणीतरी चोरीच्या उद्देशाने डोक्यात हत्याराने मारहाण करुन जीवे मारले. तसेच घरातील १२ लाख ७० हजार रुपये रोख रक्कम व सोन्याचे दागिने चोरुन नेले असल्याचे फिर्यादीत म्हटले होते. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या पथकाने व्यावसायिक कौशल्याच्या आधारे तपास सुरू केला. तपासात हा गुन्हा महेश हनुमंत खरमाळे याने केला असल्याचे निष्पन्न झाले. आरोपी भांडगाव ते जामगाव रस्त्याने दुचाकीवर येणार असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार सापळा रचून त्याला ताब्यात घेण्यात आले. पुतण्या संदीप खरमाळे याला त्याच्या राहात्या घरी जाऊन हातोड्याने डोक्यात वार करुन जिवे मारल्याची कबुली आरोपीने दिली. त्याच्या ताब्यातून दहा लाख २९ हजार रुपयांची रोकड, मोबाईल, दुचाकी, खून झालेल्या खरमाळे यांचे आधारकार्ड, एक पांढऱ्या रंगाची दोरी, असा एकूण दहा लाख ८४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीला पुढील तपासासाठी पारनेर पोलिस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली सहायक निरीक्षक हरिश भोये, संदीप मुरकुटे, पोलिस अंमलदार फुरकान शेख, श्यामसुंदर जाधव, बाळासाहेब खेडकर, मनोज साखरे, आकाश काळे, विशाल तनपुरे, रमीजराजा आत्तार आदींनी ही कारवाई केली.

## प्रसादनगर शिवारात एका व्यक्तीचा गळफास

### आत्महत्येचे कारण गुलदस्त्यात



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील राहुरी फॅक्टरी येथील प्रसादनगर भागात सोमवारी सकाळी एका ३५ वर्षीय व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली असून या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहेत.

सुभाष भीमा गायकवाड (वय ३५, रा. प्रसादनगर, राहुरी फॅक्टरी) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहेत. त्यांनी राहत्या घरातील खिडकीला गळफास घेतल्याचे सकाळी निदर्शनास आले.

घटनेची माहिती मिळताच नागरिकांनी राहुरी पोलिसांना कळविले.पोलिस हवालदार बाबासाहेब शेळके व प्रवीण बागुल यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर रुग्णवाहिका चालक रविंद्र देवगिरे यांच्या मदतीने मृतदेह शवविच्छेदनासाठी राहुरी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला.

आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस पुढील तपास करत आहेत.

मृत सुभाष गायकवाड यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली व एक मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. नेमकी आत्महत्या कशामुळे केली? याविषयी परिसरात चर्चा सुरू आहेत.

## कांदा प्रश्नावर ठाकरे गट आक्रमक

### समृद्धी महामार्गावर रास्ता रोको

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : वैजापुरात समृद्धी महामार्गावर जांबरगाव इंटरचेंजवर ठाकरे गटाने कांद्याच्या प्रश्नावरून आक्रमक होत समृद्धी महामार्ग अडवला,गळ्यात कांद्याच्या माळा घालत आंदोलकांनी रस्त्यावर टायर जाळले.यावेळी दोन्ही बाजूने शेतकरी व शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी रास्ता रोको करत सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकारली होती,आंदोलन होऊ नये म्हणून समृद्धी महामार्गाच्या पुलाखाली तगडा बंदोबस्त पाण्यात आला होता.

पोलिसांचा मोठा फौजफाटा त्याठिकाणी तैनात असताना ठाकरे गटाने पोलिसांना चकमा देत समृद्धी महामार्गावरच आंदोलन सुरू केले.विधान परिषदेचे माजी विरोधीपक्ष नेते आमदार अंबादास दानवे यांचे वाहन समृद्धी महामार्गावरील जांबरगाब टोलनाक्याजवळ आले पोलिसांचा फौजफाटा आंदोलन रोखण्यासाठी तैनात असल्याचे कळताच त्यांनी कार्यकर्त्यांसह कांद्याच्या माळा गळ्यात घालत समृद्धीवर वाहने अडवली व त्या ठिकाणी टायर जाळून चक्काजाम आंदोलन सुरू केले.

आंदोलन सुरू झाल्यावर समृद्धीवरील वाहतूक खोळंबली पोलिसांना याबाबत कळताच त्यांनी समृद्धीवर येऊन अंबादास दानवे यांना ताब्यात घेतले यावेळी दानवे यांना ताब्यात घेऊन पोलिस वाहनातून जात असताना कार्यकर्त्यांनी गाडी अडवून जोरदार घोषणाबाजी केली मात्र दानवे यांनी बाहेर येत कार्यकर्त्यांना मार्ग मोकळा करण्याचे निर्देश दिले यानंतर दानवे यांच्यासह कार्यकर्त्यांना वैजापूर पोलिस ठाण्यात आणण्यात आले.




### कांद्याला २००० हमीभाव आणि १५०० अनुदान देण्याची मागणी

कांद्याला सध्या १०० रुपये दर असून यामध्ये शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च तर सोडा मार्केट पर्यंत आणून विकण्यासाठी गाडीचे भाडेही निघत नाहीये शेतकऱ्याला जगवायचं असेल तर कांद्याला २००० रुपये भाव द्यावा व १५०० रुपये प्रतिक्विंटल अनुदान देण्यात यावे अशी मागणी ठाकरे गटाचे आमदार. अंबादास दानवे यांनी केली.

### पोलिसांत ८० जणांवर गुन्हा दाखल...

चक्काजाम आंदोलनासाठी अक्षय साठे व मनाजी मिसाळ यांनी वैजापूर पोलीस ठाण्यात परवानगीची मागणी केली होती मात्र पोलिसांनी परवानगी नाकारली याबाबत पोलिसांकडून आंदोलकांना नोटीस बजावण्यात आली होती मात्र नोटीस बजावून देखील समृद्धी महामार्गावर टायर जाळून आंदोलन केल्याने आमदार अंबादास दानवे, अक्षय साठे, मनाजी मिसाळ, विठ्ठल डमाळे, मनोज गायके यांच्यासह ८० जणांविरोधात पोलीस कॉन्स्टेबल मेटे यांनी दिलेल्या फिराडीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांनी दिली आहे.

## वडाळा महादेव परिसरात ट्रॅक्टर-दुचाकीची भीषण धडक

### ट्रॅक्टर चालकाचा मृत्यू; एक गंभीर जखमी



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील गायकवाड निंबोणी मळा परिसरात ट्रॅक्टर व दुचाकीच्या भीषण अपघातात ट्रॅक्टर चालकाचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली. नाऊरकडून हरेगाव मार्गे भरधाव वेगाने ट्रॉलीसह ट्रॅक्टर जात असताना चालकाचे नियंत्रण सुटले. त्यानंतर समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक देत ट्रॅक्टर खड्ड्यात पलटी झाले. या अपघातात नाऊर येथील रोहित अशोक अहिरे (वय ३०) यांचा मृत्यू झाला. अपघातात दुचाकीचेही मोठे नुकसान झाले असून संबंधित दुचाकीचा क्रमांक एमएच १७ सीपी ६७४७ असा आहे. ट्रॅक्टरवर क्रमांक आढळून आला नसल्याचे सांगण्यात आले. घटनेची माहिती मिळताच सरपंच सचिन पवार व स्थानिक नागरिकांनी मदतकार्य सुरू केले. दुसऱ्या ट्रॅक्टरच्या सहाय्याने ट्रॅक्टरखाली अडकलेल्या व्यक्तींना बाहेर काढून रुग्णवाहिकेतून श्रीरामपूर येथील साखर कामगार रुग्णालयात हलविण्यात आले. या घटनेत अन्य जखमींवर उपचार सुरू असून पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

## एस टी महामंडळाची स्मार्ट कार्ड वाय फाय सेवा निष्फळ

### मनःस्ताप आणि डोकेदुखीही; प्रवाशांमध्ये नाराजी

**शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांसाठी आधारशी जोडलेले 'स्मार्ट कार्ड' सुरू केले आहे. या योजनेमुळे एसटीचा प्रवास अधिक डिजिटल आणि पारदर्शक व्हावा असा परिवहन मंडळाचा प्रयत्न असला तरी आता हे स्मार्ट कार्ड स्कॅन होण्यास विलंब होत असल्याने एस. टी. बसचे वाहक प्रवाशांकडे तिकिटाचे रोख पैसे मागत आहेत.




यामुळे ही स्मार्ट कार्ड योजना फोल ठरली आहे. वाय-फाय सेवा ही असून अडचण नसून खोळंबा बनली आहे. रोख व्यवहारांच्या चौकटीपलीकडे जाऊन पारदर्शक, सुरक्षित आणि सोयीस्कर सेवा देण्याच्या उद्देशाने ही प्रणाली सुरू करण्यात येणार असल्याचे महामंडळाकडून स्पष्ट करण्यात आले. सवलतींची अचूक नोंद, पारदर्शक प्रतिपूर्ती आणि रोखविरहित व्यवहार या तिन्ही बाबी एका स्मार्ट कार्डच्या माध्यमातून एकत्रित केल्या जाणार असल्याचा दावा अधिकारी करीत आहेत.

ही योजना पूर्ण करण्यासाठी महामंडळाने ईबिक्स टेक्नोलॉजिस लि. आणि एनएसडीएल पेमेंट्स बँक यांच्याशी करार केला आहे. त्यानुसार, राज्यातील सर्व आगारांमध्ये या कार्ड्सची नोंदणी सुरू केली गेली आहे. एनसीएमसी कार्ड १९९ रुपयांत दिले जाणार असून जुने स्मार्ट कार्ड जमा केल्यास १४९ रुपयांत नवीन कार्ड दिले जाईल. याची वॉलेट मर्यादा किमान १० रुपये ते कमाल ५०० रुपये इतकी ठेवण्यात आली आहे. शिवाय आवश्यकतेनुसार ५० रुपयांच्या पटीत कार्ड रिचार्ज करता येते.

> ही योजना सध्या कुचकामी ठरली आहे. काही वर्षांपूर्वी एस. टी. बसेस मध्ये वायफाय सेवा मोठा गाजावाजा करून बसवण्यात आली, मात्र या सेवेचेही तीन तेरा वाजले आहेत. एस. टी. प्रशासनाने आपल्याला सेवेमध्ये सुधारणा करावी.
> **रणजीत श्रीगोड, बेलापूर**

या योजनेत समाजातील विविध घटकांचा समावेश करण्यात आला आहे. त्यात शालेय व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या 'सरल' क्रमांकाशी संलग्न कार्ड दिले जाणार आहे. अमृत ज्येष्ठ नागरिक, सर्वसाधारण ज्येष्ठ नागरिक तसेच महिला प्रवाशांना आधारसंलग्न स्मार्ट कार्ड देण्यात येणार आहे. दिव्यांग प्रवाशांना यूडीआयडी क्रमांकाशी जोडलेले कार्ड उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य संग्राम सैनिक, अधिस्वीकृतीधथारक पत्रकार आणि राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना विभागीय कार्यालयातील मुख्यालयामार्फत या कार्डचे वितरण केले जात आहे.

ही योजना सुरु होताच शेकडो लाभार्थ्यांनी स्मार्ट कार्ड घेतले. हे स्मार्ट कार्ड स्कॅन होण्यासाठी पाच ते दहा मिनिटे लागत असल्याने वाहक प्रवाशाकडे तिकिटाचे रोख पैसे मागत आहेत. प्रवासी मात्र पश्चाताप करीत आहेत.

## बिबट्याच्या हल्ल्यात कालवड गंभीर जखमी

### नुकसानभरपाई देण्याची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथे बिबट्याच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याची कालवड गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, झरेकाठी येथील गट क्रमांक २४० मधील शेतकरी विश्वनाथ तानाजी वाणी यांच्या घराजवळ दि. १६ मे २०२६ रोजी रात्री सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास बिबट्याने कालवडीवर हल्ला केला. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे परिसरात घबराट निर्माण झाली.



घटना लक्षात येताच विश्वनाथ वाणी यांनी आरडाओरडा केल्याने बिबट्या तेथून पळून गेला. मात्र, या हल्ल्यात कालवड गंभीर जखमी झाली असून तिच्यावर औषधोपचार करण्यात आले आहेत. तरीही कालवडीची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकरी विश्वनाथ वाणी यांनी वनविभागाकडे पंचनामा करून शासकीय मदत देण्याची मागणी केली आहे.

संबंधित शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने झरेकाठी जनसेवा युवा मंचच्या सदस्यांनीही संगमनेर वनविभागाकडे तातडीने मदत देण्याची मागणी केली आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाने बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.